K L THAKUR
AND SONS SARAF
Since 1928
Gold | Silver | Diamond
3209, Bagwanpur, Kamod Road, Nasik-422001
0253-2505488 | 2504258



नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक खपाचे पहिले सायंदैनिक

किंमत २

# भ्रमर

BHRAMAR

Physioflex.
Working towards healthy lifestyle
Physiotherapy Clinic & Fitness Studio
Dr. Moinuddin Farooque (CEO physioflex)
PHYSIOTHERAPIST (M.S.PT.)
9021756646 8329099901
Physiofit Clinic, Shop Number 2, Jumma Masjid, Naikwadi Pura, Patil Gali, Old Nashik
Shivraya Multi Speciality Hospital, DGP Nagar 2, Ambad Link Rd., Near Mauli Lawns, Kamatwade, Nashik

वर्ष ५४ वे, अंक १४
Year : 54, Issue No. : 14

नाशिक, बुधवार दि. २० मे २०२६
Nashik, Wednesday 20 May 2026

R.N.I. Regd. No.20904/72
Postal Reg. No. NSK/16/2024-2026

पाने ६, किंमत २ रुपये
Pages : 6, Price Rs. 2

# संस्थेत भागीदार करतो, असे सांगून इसमाची २३ लाखांची फसवणूक

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :- नरसी ट्रेनिंग इन्स्टिट्यूट संस्थेमध्ये भागीदार करतो, असे सांगून दोघा भावांनी एका इसमाची २३ लाख रुपयांची फसवणूक करून त्याचा अपहार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की आरोपी प्रकाश लहानू सोमवंशी, त्याचा चुलतभाऊ योगेश्वर भगवान सोमवंशी व त्यांचा मित्र गोकुळ नाना यांनी संगनमत करून फिर्यादी अमोल काशीनाथ पगारे (रा. प्रभूज् अटलांटीस, रामेश्वरनगर, गंगापूर रोड) यांना त्यांच्या समृद्धी नर्सिंग इन्स्टिट्यूट, उन्नती नर्सिंग इन्स्टिट्यूट व प्रगती नर्सिंग इन्स्टिट्यूट या संस्थांचा वार्षिक ताळेबंद व नफा यांचा हिशेब दाखवून फिर्यादी पगारे यांचा विश्वास संपादन केला व फिर्यादीला नमूद संस्थेमध्ये भागीदार करतो, असे सांगून त्यांच्याकडून अनुक्रमे ३ लाख, १० लाख व पुन्हा १० लाख अशी एकूण २३ लाख रुपयांची गुंतवणूक आरोपींनी स्वत:च्या संस्थेमध्ये करण्यास भाग पाडले.

फिर्यादी यांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने आरोपींनी फिर्यादीला भागीदार बनवून कोणत्याही प्रकारचा व्यवसाय सुरू न करता फिर्यादीची फसवणूक करून २३ लाख रुपयांचा अपहार केला आहे. हा प्रकार दि. २२ फेब्रुवारी २०२४ ते दि. १९ मे २०२६ या कालावधीत पाईपलाईन रोडवरील गणेश गॅलक्सी बिल्डिंगमध्ये घडला. या प्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात दोघा भावांसह तीन जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक देवरे करीत आहेत.

# शेअर्समध्ये अधिक परतावा देण्याचे आमिष दाखवून दाम्पत्याकडून व्यापाऱ्याची २५ लाखांची फसवणूक

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :- शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास अधिक परतावा देण्याचे आमिष दाखवून एका दाम्पत्याने ५६ वर्षीय व्यापाऱ्याची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे.**

याबाबत बाळासाहेब भीमा काठे (वय ५६, रा. तपोवन रोड, काठे मळा, नाशिक) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की गुलाबाच्या फुलांची विक्री करणाऱ्या संतोष नारायण पुंडे यांची काठे यांच्याशी सन २०१९ मध्ये ओळख झाली होती. मार्च २०२१ मध्ये संतोष पुंडे व त्यांची बायको कविता हे दोघे काठे यांच्या कार्यालयात गेले होते. ''तुम्ही शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करा,'' असा सल्ला देत ''कविता फ्रूट इंडस्ट्रीमध्ये गुंतवणूक करा, कंपनी तुम्हाला १५ ते २० टक्के परतावा देईल,'' असे सांगून त्यांचा विश्वास संपादन केला. कुंडे दाम्पत्याने काठे यांना शाश्वती व्हावी म्हणून फ्रूट कंपनीत गुंतवणूक केल्यास कविता पुंडे यांच्या नावे असलेली जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथील बिनशेतीमधील गट क्रमांक ६४३/१, जुना सर्व्हे क्रमांक ६१२/१ यापैकी ८ आर क्षेत्र गुंतवणूक रकमेच्या मोबदल्यात हमी व सुरक्षिततेसाठी लिहून देण्यास तयार असल्याचे सांगितले.

काठे यांनी पुंडे यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून दि. ९ डिसेंबर २०२१ रोजी पुंडे यांना आरटीजीएसद्वारे १२ लाख ५० हजार रुपये दिले व दि. १४ मार्च २०२२ रोजी काठे यांनी पुंडे यांना पुन्हा १२ लाख ५० हजार रुपये आरटीजीएसद्वारे दिले. अशा प्रकारे पुंडे दाम्पत्याने काठे यांच्याकडून २५ लाख रुपये स्वीकारले. अनेक दिवस होऊनही पुंडे दाम्पत्याने दिलेले परताव्याचे आश्वासन पूर्ण न झाल्याने व नारायणगाव येथील जमिनीचे खरेदी खत करून न दिल्याने काठे यांनी पुंडे याच्याकडे पैशाची मागणी केली. आरोपी पुंडे हा नेहमी काठे यांना उडवाउडवीची उत्तरे देऊन चालढकल करू लागला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच काठे यांनी पुंडे दाम्पत्याविरुद्ध उपनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पवार करीत आहेत.

# शासकीय नोकरी मिळवून देण्याच्या आमिषाने वृद्धाला साडेपाच लाखांचा गंडा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** मुलाला शासकीय नोकरी मिळवून देतो, असे आमिष दाखवून पाच जणांनी एका सेवानिवृत्त वृद्धाला ५ लाख ६७ हजार रुपयांचा गंडा घालणाऱ्या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी प्रकाश लक्ष्मण राठोड (रा. विनायक हाईट्स, धात्रक फाटा, पंचवटी) यांचा मुलगा नोकरीच्या शोधात आहे. आरोपी कमलेश दिनेश सोनवणे (रा. मूळ टाकळी, ता. चाळीसगाव, जि. जळगाव), दिनेश यशवंत सोनवणे, आनंद महाराज, थोरात ऊर्फ कुलकर्णी व रोहित हाडपे (रा. नाशिक) यांनी संगनमत करून फिर्यादीच्या घरी येऊन त्यांच्याशी संपर्क साधला.

फिर्यादीचा मुलगा मयूर राठोड याला मंत्रालयात फायनान्स डिपार्टमेंटमध्ये सिनिअर अकाऊंटंट या पदावर शासकीय नोकरी मिळवून देतो, असे आमिष दाखविले. त्यावर फिर्यादी यांचा विश्वास बसला. त्यानंतर सर्व आरोपींनी संगनमत करून फिर्यादीकडून रोख व ऑनलाईन, फोन पेद्वारे एकूण ६ लाख ६७ हजार रुपयांची रक्कम घेऊन फिर्यादीच्या मुलाच्या नावे शासकीय नोकरीची बनावट ऑर्डर तयार करून ती फिर्यादीला देऊन त्यांची आर्थिक फसवणूक केली.

हा प्रकार जुलै २०२५ ते दि. १९ मे २०२६ यादरम्यान घडला. या प्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात मुख्य संशयित कमलेश सोनवणेसह पाच जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वंजारवाडीत तीन लाखांच्या केबलची चोरी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** मोकळ्या जागेत ठेवलेली तीन लाख रुपये किमतीची केबल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना वंजारवाडी परिसरात घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी, की फिर्यादी तुषार रामनाथ काळे (वय २५, रा. काळे मळा, नाणेगाव) हे ठेकेदार म्हणून काम पाहतात. वंजारवाडी येथील मधुकर भट्टड यांच्या मोकळ्या जागेत काळे यांनी ३ लाख रुपये किमतीची दोन ड्रम केबल ठेवली होती. दि. १५ मे रोजी दुपारी ४ ते दि. १७ मे रोजी पहाटे साडेतीन वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने ही केबल चोरून नेली. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# देवदर्शनासाठी जाताना तिघांकडून महिलेचा विनयभंग

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** दर्शनासाठी हनुमान मंदिरात जाताना तिघांनी एका महिलेचा विनयभंग केल्याची घटना गांधीनगर गेटजवळ घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की दि. २ मे रोजी फिर्यादी महिला हनुमान मंदिरात दर्शनासाठी गांधीनगर गेटजवळून जात होत्या. त्यावेळी आरोपी शंकर बस्ते ऊर्फ बॉबी व सिद्धेश जोंधळे यांनी रोशन पगारे याच्या सांगण्यावरून पीडित महिलेची छेड काढून शिवीगाळ केली. त्यावेळी रोशन पगारे याने पीडित महिलेचा हात पकडून तिला जवळ ओढत स्त्रीमनास लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य केले. यावरच न थांबता रोशन पगारे त्याच्या मित्रांना म्हणाला, की ही मुलगी धंदा करते. ही फालतू आहे. तिची छेडछाड केली, तरीही काहीही करणार नाही, असे रोशन म्हणाल्याने शंकर बस्ते व सिद्धेश जोंधळे यांनी तिची छेड काढली. आरोपींपैकी एकाने पीडित महिलेला मारण्याच्या उद्देशाने तिच्या दिशेने दगड फेकला; मात्र तिने तो चुकविल्याने तिला दुखापत झाली नाही. या प्रकरणी पीडित महिलेच्या फिर्यादीवरून उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विटांनी भरलेला ट्रक उलटला, ३ जणांचा मृत्यू

**नागपूर (भ्रमर वृत्तसेवा) :-** ईसापूरजवळ विटांनी भरलेला आयशर ट्रक पलटी होऊन या अपघातात ३ मजुरांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. अन्य तिघांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, खापा येथून मोवाडकडे जात ट्रक जात असताना सावनेर मार्गावरील ईसापूर गावाजवळ पहाटेच्या सुमारास हा अपघात झाल्याची माहिती आहे. रात्री विटांचा ट्रक भरून पहाटेच्या सुमारास निघाला असताना ही दुर्दैवी अपघाताची घटना घडली आहे.

# विनयभंगाची केस मागे घेण्यासाठी मागितली २५ हजारांची खंडणी

## अश्लिल हावभाव करत केला फिर्यादीच्या पत्नीचा विनयभंग

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** विनयभंगाचा गुन्हा मागे घेण्यासाठी २५ हजार रुपयांची खंडणी मागून दुकानदाराला धमकी देणाऱ्या बहिणीसह तिच्या मित्राविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी राम तुळशीराम पवार (रा. मोरे बंगला, देवळाली कॅम्प) यांचे फुटवेअर दुकान आहे. फिर्यादी हे कुटुंबियांसह राहतात. फिर्यादी यांचे वडील तुळशीराम पवार यांनी त्यांच्या हयातीमध्ये देवळाली कॅम्प येथे संत रोहिदास सोसायटीमध्ये तीन फ्लॅट घेतले असून, तिन्ही फ्लॅटमध्ये सध्या भाडेकरू राहतात. मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात फिर्यादीची पत्नी व फिर्यादीची आई, वहिणी यांच्यात कौटुंबिक वाद झाले. त्यामुळे फिर्यादीची पत्नी ही तिच्या माहेरी रहात आहे. दि.१६ मे रोजी रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास फिर्यादीची आई, बहिणी, भाऊ असे हॉलमध्ये बसले होते. त्यावेळी पत्नी माहेर रहात असल्याचा विषय काढून तीन फ्लॅट पैकी एक फ्लॅट मला रहाण्यासाठी द्या, असे फिर्यादीने कुटुंबियांना सांगितले. त्यावेळी फिर्यादीच्या आईने नकार दिला. मात्र फिर्यादीच्या बहिणीने तिचा काही संबंध नसताना मध्ये पडून तु कोण आला फ्लॅट मागणारा असे बोलून शिवीगाळ केली. त्यानंतर फिर्यादीने तिच्या गालावर चापट मारली. त्याचवेळी फिर्यादीचा लहान भाऊ पंकज याने फिर्यादीला मारहाण करत असताना दुसरा भाऊ शाम याने मध्यस्थी केली. त्यानंतर फिर्यादीने देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात जाऊन आई, बहिण, भावाविरुद्ध तक्रार दिली. त्यावेळी फिर्यादीचे कुटुंबिय पोलीस ठाण्यातच होते.

फिर्यादीच्या बहिणीच्या परिचयाचा विनायक म्हैसधुणे नावाचा व्यक्ती तेथे आला. त्याने फिर्यादीच्या बहिणीला फिर्यादीविरुद्ध विनयभंगाची तक्रार देण्यास सांगितले. त्यानुसार पोलिसांनी फिर्यादीविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्यानंतर हे सर्व कुटुंबिय मोरे बंगला येथे आले. तेथे संशयित आरोपी म्हैसधुणे हा घरातच बसलेला होता. त्याने व फिर्यादीच्या बहिणीने फिर्यादीला शिवीगाळ करुन ह्या घरात पाय ठेवायचा नाही, इथे परत आला तर तुला मारुन टाकू अशी धमकी देऊन तेथून हाकलून दिले. त्यानंतर फिर्यादी हे सासूरवाडीला निघून गेले. १७ मे रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास फिर्यादी व त्यांची पत्नी असे दोघे (पान ६ वर)

## आजच्या महासभेवर आचारसंहितेचे निर्बंध

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):-** निवडणूक आयोगाने विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीचा कार्यक्रम सोमवारी (दि.१८) जाहीर केल्यानंतर जिल्ह्यात आचारसंहिता लागू झाली आहे. याचा थेट परिणाम महापालिकेच्या आज होणाऱ्या महासभेवर झाला असून, महासभेत कोणतेही धोरणात्मक निर्णय घेता येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्ह्यात आचारसंहिता लागू झाल्याने वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य

नियुक्तीसह विविध महत्त्वाचे ठराव मंजुरीअभावी रखडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आजच्या महासभेत शहर विकासाशी संबंधित अनेक विषयांवर चर्चा अपेक्षित होती. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या विकासकामांबाबत सदस्यांकडून प्रशासनाला प्रश्न विचारले जाणार होते. मात्र, आचारसंहितेमुळे नव्या धोरणात्मक प्रस्तावांना मंजुरी देता येणार नसल्याने प्रशासनालाही मर्यादा येणार आहेत.

# भाजपाकडून गणेश गिते, तर शिंदे सेनेकडून दराडेंची शक्यता?

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):-** विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघाची निवडणूक जाहीर झाल्याने या जागेवर शिंदे सेनेने आपला हक्क सांगितला आहे. तर सर्वाधिक मतदार संख्या भाजपाकडे असल्याने भाजपाने ही जागा ताब्यात घेण्यासाठी तयारी सुरू केल्याने महायुतीतील या दोन्ही पक्षांमध्येच उमेदवारीसाठी रस्सीखेच होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

या होऊ घातलेल्या निवडणूकीत सिटींग-गेटींग तत्त्वानुसार शिंदे सेनेने नाशिकच्या जागेवर दावा सांगितला असून, नरेंद्र दराडे हे इच्छूक मानले जात आहे. मात्र त्याच वेळी गेल्या वर्षभरात झालेल्या नगरपालिका, नगरपंचायत निवडणूका व मालेगाव, नाशिक महापालिका निवडणुकीत भाजपाने सर्वाधिक जागा जिंकून क्रमांक एकचे स्थान पटकाविले आहे. ५८१ सदस्यांना मतदानाचा हक्क असून, त्यात भाजपा वरच्या क्रमांकावर असल्याने साहजिकच भाजपाने या मतदारसंघावर दावा सांगितला आहे.

भाजपाकडून माजी स्थायी सभापती गणेश गिते हे प्रबळ दावेदार मानले जात आहे. या निवडणुकीत एकेक मत 'लाख' मोलाचे आहे. त्यामुळे निवडणुकीसाठी मनी फॅक्टर महत्त्वाचा असेल. अशा वेळी पक्षांकडून उमेदवार निवडीचा निकष आर्थिक सक्षमता महत्त्वाची ठरणार आहे. भाजपात सध्या तरी गणेश गिते यांच्या शिवाय चेहरा नाही. शिवाय मनपा निवडणुकीत त्यांनी स्वत: थांबण्याचा निर्णय घेतला व त्यांना पक्षाने विधान परिषदेचा शब्द दिल्याचे सांगितले जात असून त्यामुळे गणेश गिते यांची दावेदारी प्रबळ आहे. दुसरीकडे महायुतीतील अजित पवार यांची राष्ट्रवादी तिसऱ्या क्रमांकावर असून त्यांची मते देखील निर्णायक आहेत. सध्या भाजपासोबत हा पक्ष सत्तेत असल्याने भाजपालाच त्यांचा फायदा अधिक आहे. महानगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीत राष्ट्रवादीने काही ठिकाणी शिंदे सेनेसोबत तर काही ठिकाणी भाजपासोबत युती केली होती. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघात या पक्षाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

या निवडणुकीत महाविकास आघाडीकडेही मतदार आहेत. मात्र त्यांच्या बळावर निवडणुकीत विजय मिळविणे कठीण आहे. त्यांना अपक्ष तसेच मालेगावच्या इस्लाम पक्षाची मदत घ्यावी लागेल. याशिवाय छोट्या पक्षांवरही त्यांची भिस्त राहणार आहे. सध्या तरी महाविकास आघाडीकडे उमेदवार दिसत नाही. मात्र जागा कोणाला सुटते यावर पुढील रणनीती ठरणार आहे.

# महापौरांनी बोलावली ट्रॅफिक पार्क संदर्भात आज विशेष बैठक

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** शहरात रस्ता सुरक्षा आणि वाहतूक जनजागृतीचे काम करणाऱ्या ट्रॅफिक एज्युकेशन पार्कच्या भवितव्याबाबत आज नाशिक महापालिकेत महत्त्वपूर्ण बैठक बोलविण्यात आली आहे. महापौर हिमगौरी आहेर-आडके यांनी दुपारी या विशेष बैठकीचे आयोजन केले आहे.

> बैठकीनंतर ट्रॅफिक पार्कच्या भवितव्याबाबत स्पष्टता येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. ट्रॅफिक एज्युकेशन पार्क हा शहरासाठी महत्त्वाचा उपक्रम आहे. सर्व संबंधित पक्षांची भूमिका समजून घेत सकारात्मक मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल. नागरिकांच्या हिताला प्राधान्य देत निर्णय घेतला जाईल.
>
> – हिमगौरी आहेर-आडके, महापौर, नाशिक.

ॲडव्हांटेज नाशिक फाउंडेशन (नाशिक फर्स्ट) च्या पदाधिकाऱ्यांना निमंत्रित करण्यात आले आहे. त्यामुळे बंद पडलेल्या ट्रॅफिक पार्कबाबत त्यात काही सकारात्मक तोडगा निघण्याची शक्यता आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींकडून झालेल्या आरोपांनंतर आणि त्यातून निर्माण झालेल्या वादामुळे नाशिक फर्स्टने ट्रॅफिक एज्युकेशन पार्कमधून माघार घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर संस्थेने पार्कमधील साहित्य, प्रशिक्षण उपकरणे आणि अन्य सामग्री हटवण्यास सुरुवात केली होती. या पार्श्वभूमीवर महापौरांनी पुढाकार घेत ही बैठक बोलविली असल्याचे सांगितले जात आहे. फेब्रुवारी महिन्यात महासभेत ट्रॅफिक पार्क सर्वसामान्यांसाठी खुले नसल्याचा मुद्दा उपस्थित झाल्यानंतर या प्रकरणाला सुरुवात झाली होती. त्यानंतर पाहणी दौरे, आरोप-प्रत्यारोप आणि चौकशी समितीच्या घोषणेमुळे वातावरण अधिकच तापले होते.

दरम्यान, आजच्या बैठकीत करार नूतनीकरण, पार्क सर्वसामान्यांसाठी अधिक खुले करण्याचा आराखडा, जॉगिंग ट्रॅकचा प्रश्न तसेच भविष्यातील कामकाजाबाबत चर्चा होण्याची शक्यता आहे.

# विधान परिषद निवडणूक रिंगणात देवीदास पिंगळे

## राजकीय हालचालींना वेग : इच्छुकांनी सुरू केल्या रणनीती

**नाशिक(भ्रमर प्रतिनिधी) :-** राज्यातील १६ विधान परिषद जागांसाठी कार्यक्रम जाहीर झाला असून या निवडणुकीत ३७ मतांनी विजय मिळविलेले माजी खासदार देवीदास पिंगळे हे आगामी विधान परिषद निवडणुकीसाठी इच्छुक असून त्या दृष्टीने देवीदास पिंगळे यांनी हालचाली गतिमान केल्या आहेत.

देवीदास पिंगळे हे विधान परिषद निवडणूक लढणार असले तरी त्यांनी कुठल्या पक्षाकडून उमेदवारी करणार याबाबत आपली भूमिका अद्याप स्पष्ट न केल्याने कोणत्या पक्षाकडून उमेदवारी करणार हा ट्विस्ट कायम ठेवल्याने नाशिकच्या राजकारणात वेगवेगळ्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील १६ जागांसाठी निवडणूक जाहीर झाल्यानंतर नाशिकमध्ये राजकीय हालचालींना वेग आला आहे. महायुतीत शिवसेनेने या जागेवर दावा केल्यानंतर इच्छुकांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. शिवसेनेत संपर्कनेते भाऊसाहेब चौधरी, उपनेते अजय बोरस्ते, विजय करंजकर आणि माजी आ. नरेंद्र दराडे यांची नावे चर्चेत आहेत. महाविकास आघाडीत शिवसेना (उबाठा) कडून उमेदवाराचा शोध सुरू असून, महायुतीत नरेंद्र दराडे यांना उमेदवारी मिळाल्यास राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील १६ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून त्यात नाशिकचाही समावेश आहे. नाशिक विधान परिषद मतदार संघात १९९४-९५ मध्ये अपक्ष उमेदवार शांताराम आहेर विजयी झाले होते. त्यानंतर २००० मध्ये काँग्रेसकडून गोपाळराव गुळवे, शिवसेना-भाजप तर्फे वसंत गिते तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून देवीदास पिंगळे यांनी उमेदवारी केली होती. काँग्रेसमधून राष्ट्रवादी बाहेर पडली होती. त्यावेळी सुरेश खेताडे हे मनपाचे एकमेव मतदान असताना देखील देवीदास पिंगळे यांनी (पान ६ वर)

# बाळाच्या पोटात होते अर्भक; एसएमबीटीत दुर्मिळ शस्त्रक्रिया

## पाच लाख जन्मामागे आढळते अशी विसंगती

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** वैद्यकीय क्षेत्रात अत्यंत दुर्मिळ मानली जाणारी 'फिटस इन फिटू' ही शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात डॉक्टरांना यश आले आहे. बालरोग शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. अंजली चितळे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने एका चिमुरड्याच्या पोटातील अविकसित अर्भकाचे अवशेष यशस्वीरित्या बाहेर काढून त्याला जीवदान दिले.

जगभरात अशा प्रकारच्या अत्यंत मोजक्या केसेसची नोंद असून, या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे वैद्यकीय वर्तुळासह सर्व स्तरातून या कामगिरीचे कौतुक होत आहे.

अधिक माहिती अशी की, एका बालकाला पोट फुगणे, सतत होणाऱ्या उलट्या आणि दूध न पचणे अशा तक्रारींमुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. प्राथमिक तपासणीत पोटात मोठी गाठ असल्याचे दिसून आले. मात्र सखोल रेडिओलॉजिकल चाचणीत या बाळाच्या पोटातील रेट्रोपेरिटोनियम भागात एका दुसऱ्या अविकसित मानवी अर्भकाचे अवशेष असल्याचे निदान झाले. ही शस्त्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची होती, कारण त्या अर्भकाचा रक्तपुरवठा मुख्य बाळाच्या रक्तवाहिन्यांशी जोडलेला होता. एसएमबीटी हॉस्पिटलच्या तज्ज्ञांनी कौशल्याने बाळाच्या महत्त्वाच्या अवयवांना कोणताही धक्का न लावता हे अवशेष वेगळे केले. बाहेर काढलेल्या अवशेषांमध्ये पाठीचा कणा आणि हात-पायांची प्राथमिक रचना विकसित झाल्याचे दिसून आले होते. त्या म्हणाल्या, 'फिटस इन फिटू' ही स्थिती अत्यंत दुर्मिळ श्रेणीत येते. जागतिक आकडेवारीनुसार, दर ५ लाख जिवंत जन्मांमागे केवळ एका बालकात ही विसंगती आढळू शकते. १८ व्या शतकात पहिल्यांदा या स्थितीचे वर्णन झाले असून, आतापर्यंत संपूर्ण जगभरात अशा केवळ २०० पेक्षा कमी केसेसची अधिकृत नोंद झाली आहे. यामुळेच प्रत्येक केस ही वैद्यकीय संशोधनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या स्थितीच्या कारणांबाबत वैद्यकीय क्षेत्रात दोन मुख्य प्रवाह आहेत. सर्वात मान्य सिद्धांतानुसार, जेव्हा आईच्या गर्भात एकाच बिजांडापासून दोन जुळी मुले वाढू लागतात, तेव्हा पेशींच्या असमान विभाजनामुळे एक गर्भ दुसऱ्या गर्भाच्या शरीरात पूर्णपणे सामावला जातो. याला 'पॅरासिटिक ट्विन' किंवा परजीवी जुळे असेही म्हणतात. दुसरा सिद्धांत याला 'टेराटोमा' (एक प्रकारची गाठ) मानतो, परंतु पाठीचा कणा आणि अवयवांची निर्मिती ही केवळ गर्भावस्थेतील विसंगतीमुळेच शक्य असल्याने पहिला सिद्धांत अधिक ग्राह्य धरला जातो.

> **आजाराचे अचूक निदान महत्वाचे**
>
> सामान्य रुग्णालयांमध्ये ज्या केसेस हाताळणे कठीण असते, अशा गुंतागुंतीच्या आणि दुर्मिळ वैद्यकीय केसेस यशस्वीरित्या सोडवणे ही एसएमबीटी रुग्णालयाची ओळख आहे. 'फिटस इन फिटू' सारख्या जगात ५ लाख जन्मांमागे एकदा आढळणाऱ्या प्रकरणांपासून ते क्लिष्ट जन्मजात दोष आणि मोठ्या ट्यूमरच्या शस्त्रक्रियांपर्यंतची सर्व आव्हाने येथील डॉक्टरांनी यशस्वीरित्या पेलली आहेत. ही शस्त्रक्रिया आमच्यासाठी एक मोठे आव्हान होते, अशा प्रकरणांत अचूक निदान होणे महत्त्वाचे असते. शस्त्रक्रियेनंतर बाळ आता पूर्णपणे सुखरूप असून त्याची प्रकृती सुधारत आहे.
>
> –डॉ. अंजली चितळे, बालरोग शस्त्रक्रिया तज्ज्ञ

ही शस्त्रक्रिया यशस्वी पार पाडण्यासाठी डॉ. प्रखर नागर, डॉ. अनुप्रित सातपुते, डॉ. सविनय पाटील, डॉ. अनुज रंगम, डॉ अश्रित राळे, डॉ. दिव्या सिंग, डॉ. प्रियांका खर्डे यांच्यासह बालरोग, भूलतज्ज्ञ, रेडीओलॉजी आणि पथोलॉजी विभागातील सर्व तज्ज्ञांनी मेहनत घेतली. या सर्वांचे एसएमबीटी प्रशासनाकडून कौतुक करण्यात आले.

**पालकांनी काय काळजी घ्यावी?** अशा केसेसमध्ये अनेकदा जन्मानंतर लगेच लक्षणे दिसत नाहीत. बाळाचे पोट असामान्यपणे फुगलेले दिसल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. दूध पिण्यास त्रास होणे किंवा वारंवार उलट्या होणे अशा लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. गर्भावस्थेदरम्यान नियमित 'अँटी-नेटल' सोनोग्राफी करणे अनिवार्य आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे गर्भात असतानाच अशा विसंगतींचे निदान होऊ शकते. ज्यामुळे जन्मानंतर तातडीने उपचार करणे सोपे जाते.

**गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया आणि यशस्वी उपचार हीच ओळख**

एसएमबीटी हॉस्पिटलच्या अनुभवी नेतृत्वाखालील तज्ज्ञ शल्यचिकित्सक, कुशल भूलतज्ज्ञ आणि अहोरात्र सेवा देणारा प्रशिक्षित नर्सिंग व सपोर्टिंग स्टाफ यामुळेच अशा 'हाय-रिस्क' केसेसमध्ये उत्तम यश मिळवणे शक्य झाले. अचूक निदानासाठी आवश्यक असलेले अत्याधुनिक सीटी स्कॅन, एमआरआय आणि जागतिक दर्जाचे ऑपरेशन थियेटर्स यांसारखी सर्व आधुनिक साधनसामग्री येथे एकाच छताखाली उपलब्ध आहे, असे आरोग्य सेवा एसएमबीटी सेवाभावी ट्रस्टचे सचिन बोरसे म्हणाले.




## राशीभविष्य

- **मेष** : उत्साहवर्धक घटना घडतील. प्राप्तीचं प्रमाण तसंच राहील. आनंदी, समाधानी रहाल.
- **वृषभ** : व्यवसायात अनुकूलता वाढेल. सरकारी कामांना गती येईल, स्थावर प्रश्न विचारानं सोडवावेत.
- **मिथुन** : नोकरीत कामाचा ताण राहील. विद्यार्थ्यांना अडचणी संभवतात. कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल.
- **कर्क** : महत्त्वाची कामं मनासारखी होतील. खरेदीचे व्यवहार मार्गी लागतील. प्रवास लाभदायक ठरेल.
- **सिंह** : काही प्रश्न हैराण करतील. व्यवसायात साधारण स्थिती राहील. वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं.
- **कन्या** : नव्या जबाबदाऱ्या विचारपूर्वक स्वीकाराव्या. प्रवास लांबणीवर टाकावा. प्रकृतीची काळजी घ्यावी.
- **तूळ** : आत्मविश्वास वाढीस लागेल. नवे करार लाभदायक ठरतील. प्रेम प्रकरणात अनुकूलता राहील.
- **वृश्चिक** : अपेक्षित वार्ता कानी येईल. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. घरगुती वादावर वेळीच तोडगा काढा.
- **धनु** : बरोजगारांना उत्तम संधी लाभतील. विवाहाची बोलणी मार्गी लागतील. सरकारी कामांना गती येईल.
- **मकर** : अचानक धनलाभ संभवतो. मुलांच्या कलांना उत्तम वाव मिळेल. नव्या ओळखींचा लाभ घ्यावा.
- **कुंभ** : महत्त्वाची कामं रेंगाळतील. आर्थिक प्रश्नाचा ताण राहील. जुन्या वास्तुची दुरूस्ती करून घ्यावी.
- **मीन** : महत्त्वाच्या भेटीगाठी होतील. नवे करार मार्गी लागतील. स्थावर, वाहन सौख्य लाभणार आहे.

स्किल डेव्हलपमेंट

## विस्तारा ब्लॉगचं विश्व

* नियमित उत्पन्न मिळवण्यासाठी ब्लॉगवर चांगला मजकूर प्रकाशित करायला हवा. तुमचं म्हणणं लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचायला हवं. ब्लॉगला भेट देणाऱ्याचं तिथे स्वागत व्हायला हवं. त्यामुळे ब्लॉगच्या डिझाइनवर भर द्या. वाचकांना तुमच्या ब्लॉगला भेट द्यावी असं वाटायला हवं.

* वाचकांमध्ये लोकप्रिय असणाऱ्या ब्लॉग्जवरही लिखाण करा. तुमचं नाव वाचकांपर्यंत पोहाचवायला हवं. तुमच्या विषयाला अनुसरून ब्लॉग्जची निवड करा.

* ॲड नेटवर्कच्या माध्यमातून ब्लॉगवरच्या जाहिराती सादर करा. भारतीय ब्लॉगर्ससाठी गुगल ॲडसेंस अधिक लाभदायी ठरतं.

* ब्लॉगच्या प्रसिद्धीसाठी सोशल मीडियाचाही वापर करा. दिवसातला काही वेळ सोशल मीडियासाठी द्या. तुमचं लिखाण शेअर करा. व्हॉट्स ॲप ग्रुप्सवरही तुमचं लिखाण पाठवा. यामुळे तुमचा वाचक वर्ग वाढायला मदत होईल. पर्यायाने जाहिरातींची संख्या वाढेल.

## २० मे

दिनविशेष

- **१९९४** : महाराष्ट्राचे राज्यपालपद भुषणलेले कासू ब्रह्मानंद रेड्डी यांचं निधन.
- **२०१३** : दहशतवादविरोधी न्यायालयाने पाकिस्तानचे माजी अध्यक्ष परवेज मुशर्रफ यांना बेनझीर भुत्तो हत्येप्रकरणी जामीन मंजुर केला.
- **२०१७** : इराणमधील अध्यक्षीय निवडणुकीत अध्यक्ष हसन रोहानी ५७ टक्के मते मिळवून विजयी झाले.
- **२०१८** : दंतेवाडा जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी घडवून आणलेल्या स्फोटात आठ पोलीस हुतात्मा.

परिचय

## भेट काय द्यावी?

आप्तस्वकियांना भेटवस्तू देणं ही एक सर्वसाधारण बाब. अशाच काही वस्तूंविषयी जाणून घेऊ या... * मातीची मूर्ती किंवा वस्तू भेट देणं किंवा भेट म्हणून स्वीकारणं शुभ मानलं जातं. मातीच्या वस्तू घरात ठेवल्याने अडकलेला पैसा मिळतो आणि संपत्तीत वृद्धी होते. * दोन गणपती प्रतिमा असणारी मूर्ती किंवा चित्र भाग्यकारक मानलं जातं. अशी मूर्ती भेट दिल्याने घरात सुखसमृद्धी नांदते, असं म्हणतात. पण दोन्ही मूर्तींमध्ये गणपतीचं तोंड समोरच्या बाजूला असावं, हे लक्षात ठेवा. * भेटीदाखल कपडे देणं भाग्यकारक समजलं जातं. कपडे भेट देणाऱ्या आणि घेणाऱ्या अशा दोघांचाही भाग्योदय होतो, असं म्हणतात. * शुभ प्रसंगी हत्ती किंवा हत्तीची जोडी भेट म्हणून देणं शुभं मानलं जातं. सोनं, चांदी, लाकूड किंवा पितळ्याचा हत्ती भेट म्हणून देता येईल. * चांदीच्या वस्तू देणं तसंच घेणं शुभ मानलं जातं. चांदीची नाणी किंवा वस्तू दिल्याने दोघांचाही भाग्योदय होतो असं म्हणतात. चांदीच्या वस्तू भेटीदाखल दिल्याने देवी लक्ष्मी प्रसन्न होते अशी श्रद्धा आहे.

### पंचांग

**बुधवार, २० मे २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, अधिक ज्येष्ठ शु. ४, चंद्रराशी : मिथुन, नक्षत्र : आर्द्रा/पुनर्वसु, योग : शूल, सूर्योदय ६.०५, सूर्यास्त ७.०६

### फॉरवर्ड्स

**वों शिक़ायतें भीं अब बड़े सलीक़े से क़रने लगें हैं...**

**ज़हर घोल क़र लफ़्ज़ों में उन्हें शहद कहनें लगें हैं...!**

आरोग्यमंत्र

## मानसिक त्रास?

सध्या शारीरिक व्याधींबरोबरच मानसिक व्याधीही वाढत आहेत. वाढत्या ताणतणावांमुळे तसंच बदलत्या जीवनशैलीमुळे शरीराबरोबर मनही व्याधीग्रस्त झाल्याचं दिसत आहे. मात्र आजही मानसिक दुखण्यांवर फारशी चर्चा होत नाही. त्यामुळे डिप्रेशन वाढू शकतं. हे टाळायचं तर काही बाबींची दखल घ्यायला हवी.

* चिप्स, इन्स्टंट नूडल्स अथवा यासारखं प्रोसेस्ड फूड आहारात



असेल तर त्यातील विषाक्त घटकांमुळे मेंदूतील रसायनांमध्ये असंतुलन निर्माण होतं. परिणामी डिप्रेशनचा धोका वाढतो. म्हणूनच प्रोसेस्ड फूड आहारातून वर्ज्य करावं. * स्वउन्नतीसाठी एकांतवास महत्त्वाचा असला तरी दिवसेंदिवस एकटं राहणं, समाजात न मिसळणं ही नकारात्मकता वाढवणारी बाब ठरते. * सोशल मीडियाचा अतिरेकी वापर तुम्हाला नैराश्याकडे झुकवू शकतो. नातलगांशी संवाद खुंटणं आणि आभासी विश्वात रमणं ही बाब मेंदूतील काही घटकांच्या असंतुलनाला कारणीभूत ठरते. * नकारात्मक विचार असणाऱ्या माणसांच्या सानिध्यात राहिल्यासही डिप्रेशनाचा धोका संभवतो. * अतिरेकी धूम्रपान ही व्यसनी लोकांना डिप्रेशनमध्ये ढकलणारी बाब ठरते. निकोटीनच्या प्रभावामुळे रासायनिक असंतुलनाचा तो परिणाम असतो. शारीरिक हालचालींचा अभाव, निष्क्रिय जीवनशैली, महिलांमध्ये जन्मनियंत्रण गोळ्यांचं सेवन आदी कारणांमुळेही डिप्रेशन वाढू शकतं. मेंदूतील सेरोटोनिनचा स्तर खालावतो आणि व्यक्ती डिप्रेशनच्या दिशेने वाटचाल करु लागते.

### फिटनेस फंडा

* नाही म्हटलं तरी व्यायाम थकवून टाकतो. त्यामुळे व्यायामाचा वेळ कमी करण्याकडे अथवा थकवणारे व्यायाम प्रकार टाळण्याकडे अनेकांचा कल असतो. पण पर्सनल ट्रेनर तुम्हाला अधिक धावण्यासाठी, अधिक पुश अप्स करण्यासाठी, अधिक जड प्लेट्स उचलण्यासाठी, ट्रेडमीलवर अधिक काळ धावण्यासाठी प्रवृत्त करतो.

* जंक फूड खाण्याची इच्छा होते तेव्हा पर्सनल ट्रेनरचे शब्द कानात घुमतात आणि तुम्ही मोहाचे ते क्षण टाळू शकता. कारण हा फिटनेस तज्ज्ञ तुमचं समुपदेशनही करत असतो. **(क्रमश:)**

करिअरवाटा

## खुणावतंय विमा क्षेत्र

विमाक्षेत्र हे सध्याच्या विस्तारत्या क्षेत्रांमधील एक आहे. म्हणूनच या क्षेत्रात कारकिर्द घडवायची असल्यास काही अभ्यासक्रमांची मोलाची साथ मिळते. अशा अभ्यासक्रमांमध्ये विमा उद्योगाशी संबंधित कायदे, माहिती-तंत्रज्ञान असे विषय शिकवले जातात. आयुर्विम्याचं मार्केटिंग



आणि विविध योजनांचे तपशील तसंच तथ्ये यांचाही अशा अभ्यासक्रमांमध्ये समावेश असतो. कोणतीही पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यास अशा अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येतो. शिवाय कोणत्याही विमा कंपनीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना किंवा अधिकाऱ्यांना प्रवेश मिळतो. विमा क्षेत्राशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विमा व्यवसाय म्हणजे नेमकं काय आणि कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत त्याचं काय महत्त्व असतं याची माहिती प्राप्त होते. विमा क्षेत्रातच करिअर करण्याची इच्छा असणाऱ्यांनी या अभ्यासक्रमांचा अवश्य विचार करायला हवा. आपल्या जवळच्या संस्थेत असा अभ्यासक्रम उपलब्ध आहे का, याची चौकशी करून तशी सुविधा असेल तर लाभ घेता येईल. आता या क्षेत्रातही खासगी कंपन्या कार्यरत झाल्यामुळे स्पर्धा वाढली आहे. उत्तम वेतन आणि इतर सवलतींमुळे या क्षेत्रातील कारकिर्दीचा विचार महत्त्वाचा ठरेल.

खेचाखेची

## गुप्तहेर

काय हो, तुम्ही पोलीस का? एक माणूस पोलीसाच्या गणवेशातल्या माणसाला विचारतो.

नाही, मी गुप्तहेर आहे.

मग तुम्ही हा गणवेश का घातला आहे?

कारण आज मी रजेवर आहे !

### वेगळं काही

अमेरिकेतल्या अलास्कामध्ये व्हिटियर नावाचा छोटासा तालुका आहे. हा संपूर्ण तालुका फक्त एका इमारतीत वसला आहे. या १४ मजली इमारतीचं नाव बेगिच टॉवर असं आहे. म्हणूनच याला व्हर्टिकल टाउन असंही म्हणतात. या एकमेव इमारतीत २०० कुटुंब रहातात. या कुटुंबांच्या गरजेची प्रत्येक गोष्ट या इमारतीत उपलब्ध आहे. त्यामुळे इथल्या लोकांना इमारतीबाहेर जावं लागत नाही. इथे चर्च आहे. पोलीस स्थानक, लाँड्री, रेस्टॉरंट, शाळा, दवाखाना, रुग्णालय असं सगळं आहे. या इमारतीत कार्यालयंही आहेत. विशेष म्हणजे कार्यालयातले कर्मचारी आणि मालक याच इमारतीत रहातात. अमेरिका-रशिया शीतयुद्धादरम्यान इथे सैन्याच्या रहाण्याची सोय करण्यात आली होती.

स्टाईल स्टेटमेंट


## चर्चा ऑफ शोल्डर ड्रेसची

आजकाल अनेक महिला-युवती ऑफ शोल्डर स्टाईल आपलीशी करत आहेत. या स्टायलिंगमधील काही ट्रेंड्स जाणून घेऊ या.



* ऑफ शोल्डर ड्रेसचं स्टायलिंग एथनिक पद्धतीने करणार असाल तर एम्ब्रॉयडरी केलेल्या पलाझोसोबत टॉप कॅरी करा. पलाझोवर ट्युब ऑफ शोल्डर कुर्ती खास लूक देईल. * अप्पर बॉडीचं वजन जास्त असल्याने काही महिला ऑफ शोल्डर ड्रेस कॅरी करणं टाळतात. अशांसाठी टिअर ऑफ शोल्डर ड्रेस उत्तम पर्याय आहे. या ड्रेसमध्ये स्लिम दिसणं शक्य होतं. पण तुम्ही स्लिम असाल तर बेल्ट लावून कर्व्हज हायलाईट करू शकता. * इव्हनिंग पार्टीला जाण्याच्या तयारीत असाल तर ट्युनिक ऑफ शोल्डर ड्रेस सर्वोत्तम पर्याय आहे. * ऑफ शोल्डर स्टायलिंगला खुलवणारा ड्रेस प्रकार म्हणजे गाऊन. खांद्यांना उठाव देण्यासाठी लेसवाल्या ड्रेसची निवड करा. यावर पर्ल किंवा स्टोन्सचे एअरिंग्ज घातल्यानंतर एलिगंट लूक मिळेल. * ऑफ शोल्डर ड्रेससोबत फ्रिल्स किंवा कट स्लीव्हज टॉपही ट्रेंडमध्ये आहेत. क्रॉप टॉप वर हाय वेस्ट जेगिंग्ज किंवा जीन्स ट्राय करू शकता.

## शब्दकोडे क्रमांक २२२२



**आडवे शब्द :-**

१) ------------ –निंबोणीच्या झाडामागे लपलास कां ? एक बालगीत
९) थरथर
११) दुबळा, गरीब
१२) नड
१३) कप्पा, खण
१५) यजमान
१७) वागण्याची पद्धत
२०) कमळ
२३) धुलीकण
२४) किरकोळ सामान
२७) अवास्तव
२९) अंत:करण
३०) स्तर, एकावर एक रचलेले
३१) विश्व
३२) पर्वत, माल
३३) सदोदित
३५) खाटिक
३८) गोसावी, भटक्या
४१) डावा
४३) प्रत्येक महिन्यास
४४) लोकांचे विचार
४५) पुन्हा
४६) टीका करणारा
४८) टरफल
४९) घशाला आलेली तृष्णता
५०) मान्यतेचा शब्द
५१) नासलेला
५३) इलाज
५५) अरण्य
५७) पोरका
५९) बारा वर्षाचा काळ
६१) नृत्यकलेचे दैवत
६३) रांग
६४) कर्ज देणारा
६६) शुभ्र, पांढरा
६९) धमनी
७०) वंदनाचा एक शब्द
७१) त्वरित, लगेच, तात्काळ

**उभे शब्द :-**

१) रौप्य
२) दोन वेळा
३) भला
४) जाड धागा
५) भाकरीचे एक धान्य
६) एक शेंगभाजी
७) श्रेष्ठ, वरचढ
८) चुलता
१०) बदल
१४) निराश, खिन्न
१६) श्रीरामाच्या वडिलांचे नाव
१८) वृक्ष
१९) गतिमान
२१) आजूबाजूस
२२) स्तुती करणारा
२३) दही, वरण घुसळण्याचे साधन
२५) तफावत, अंतर
२६) दुलई
२८) जगाचे कालचक्र
२९) दारु
३४) वणवा
३६) मलई
३७) हिन्दुस्थान
३९) चंद्र
४०) वाळवंट
४२) अंत:करण
४३) खाचखळग्याची जमीन
४४) हुबेहूब
४५) पंख
४७) द्रव पदार्थ
४९) आंब्याची बी
५२) अंजन
५४) भेग बुजविणारी निमुळती पट्टी
५६) अत्यंत दुष्ट माणूस
५८) विविध, अनेक
६०) वारा, मरुत
६१) मऊ
६२) एक बारीक धान्य
६५) कैराचा चीक, काथ
६७) वेल
६८) विहीर

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## नगरसेविका कविता नाईक यांच्या पुढाकाराने प्रभाग २५ मध्ये स्पीड ब्रेकर्स



**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** प्रभाग क्रमांक २५ मधील नागरिकांनी मांडलेल्या रस्ता सुरक्षेच्या प्रश्नाची दखल घेत नगरसेविका कविता नाईक यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. त्यामुळे प्रभागातील विविध संवेदनशील ठिकाणी स्पीड ब्रेकर व रम्बलर बसविण्याच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे. काही ठिकाणी काम पूर्ण झाले असून, उर्वरित ठिकाणीही कामे लवकरच होतील.

प्रभागातील शाळा, महाविद्यालये, हॉस्पिटल तसेच निवासी परिसरालगत वाहनांची वाढती व अतिवेगाने होणारी रहदारी लक्षात घेऊन महानगरपालिकेकडे याबाबत निवेदन सादर करण्यात आले होते. त्यानंतर संबंधित विभागाने प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने आवश्यक कार्यवाही सुरू केली.

या कामांमुळे नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, तसेच लहान बालकांच्या सुरक्षिततेसाठी मोठा दिलासा मिळणार असून, स्थानिक नागरिकांनी नगरसेविका कविता नाईक यांच्या तत्परता व जनहितासाठीच्या पाठपुराव्याचे स्वागत केले आहे.

सभी शुभअंक संख्याशास्त्र और ज्योतिषशास्त्र पर आधारित है।

बुधवार २०/५/२०२६ कल्याण शुभअंक

| | | |
|---|---|---|
| २ | ८ | ९ |
| १४७ | १७० | १४४ |
| ३४५ | ११६ | २७० |
| २४ | ८२ | ९५ |
| २६ | ८४ | ९७ |

बुधवार २०/५/२०२६ मुंबई शुभअंक

| | | |
|---|---|---|
| १ | ४ | ७ |
| २३६ | १४९ | १२४ |
| ४७० | ३४७ | ८९० |
| १७ | ४६ | ७३ |
| १९ | ४८ | ७५ |

## छोटी जाहिरात

### ज्योतिष

ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र व जन्मकुंडलीप्रमाणे. श्री प्रभू ज्योतिष ऋषी. **संपर्क : काश्यपी फ, मामा मुंगी कार्यालयामागे, पंपिंग स्टेशन, गंगापूर रोड, नाशिक. मो. नं. ७५०७००६३८६.**

**वाचकांना सूचना :-** भ्रमर वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्याची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल भ्रमर वृत्तपत्र जबाबदार राहणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

# ... तर मुंबई-आग्रा महामार्गावर रास्ता रोको आंदोलन : आ. रोहित पवार

**लासलगाव (भ्रमर वार्ताहर) :-** कांद्याला चोवीसशे रुपये भाव शासनाने जाहीर करून थेट बाजार समिती कांदा खरेदी केली पाहिजे, याची घोषणा शासनाने येत्या आठ दिवसांत केली नाही, तर दि. २६ मे रोजी कांद्याला रास्त भाव मिळावा यासाठी चांदवड येथे मुंबई-आग्रा महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल व महाराष्ट्रातील शेतीमाल दिल्लीत जाणार नाही. कांदा पिकाला कमी भावाचा अन्याय सहन करणार नाही, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी लासलगाव येथे कांदा उत्पादकांसमोर बोलताना दिला.

नुकत्याच झालेल्या दौऱ्यात येथील सभेस खा. भास्कर भगरे आणि खा. नीलेश लंके, लासलगाव बाजार समितीचे माजी सभापती जयदत्त होळकर, माजी आमदार भुसारा, सोनिया होळकर, तानाजी आंधळे, प्रवीण कदम, माणिकराव शिंदे, दत्तात्रय पाटील, डॉ. सुजित गुंजाळ, शिवा सुरासे, लासलगाव बाजार समितीचे संदीप दरेकर, छबुराव जाधव, राजेंद्र बोरगुडे, महेश पठाडे, प्रवीण कदम, बाळासाहेब दराडे व रमेश पालवे यांच्यासह हजारो शेतकरी कांदा आंदोलक उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. रोहित पवार यांनी आज मला काही भाषण करावयाचे नाही. आज पाच ते सहा रुपयांपेक्षा कमी भाव मिळत आहे. जरी भाव कमी मिळाला तरी आत्महत्या करू नका. केंद्र शासनाचे सत्तारूढ पक्षाचे दलाल प्रोड्युसर कंपन्या चालवीत असून, त्यांनी कमी भावात खरेदी केलेला कांदा विक्री होण्यासाठी बारा रुपये प्रमाणे पैसे भाव मुख्यमंत्री जाहीर करतात, ज्यांना शेती पिकाचे काही समजत नाही, अशा कांदा अभ्यास समितीचे अध्यक्ष पाशा पटेल यांची नियुक्ती हास्यास्पद आहे.

मुख्यमंत्री केवळ ट्विट करतात प्रत्यक्षात बाजार आवारात जा, म्हणजे तुम्हास कांदा उत्पादकांच्या व्यथा समजतील. मोदी सरकारच्या इराणप्रश्नी भूमिकेमुळे इंधनाचे संकट देशावर उभे आहे, असे सांगून रोहित पवार यांनी सोने खरेदी करू नका, इंधन खरेदी करू नका, हे लोकांना सांगणे म्हणजे केंद्र शासनाचा नाकर्तेपणा आहे, असा आरोप आमदार रोहित पवार यांनी केला.

**आंदोलनाची भूमिका**

कांद्याला तीन हजार रुपये हमीभाव शासनाने जाहीर करून



थेट बाजार समितीमार्फत कांदा खरेदी केली पाहिजे, तसेच मागील अनुदानाचे शिल्लक राहिलेले १५० रुपये प्रतिक्विंटल कांदा अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांना देण्यात यावी; अन्यथा दि. २६ मे रोजी चांदवड येथील मुंबई आग्रा महामार्गावर हे आंदोलन करण्यात येईल, अशी घोषणा राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी लासलगाव येथे याप्रसंगी बोलताना केली.

यावेळी लासलगाव बाजार समितीचे माजी सभापती जयदत्त होळकर, माजी आमदार भुसारा, सोनिया होळकर, तानाजी आंधळे, प्रवीण कदम, माणिकराव शिंदे, दत्तात्रय पाटील, शिवा सुरासे लासलगाव बाजार समितीचे संदीप दरेकर यांच्यासह हजारो शेतकरी कांदा आंदोलनात उपस्थित होते. यावेळी सकाळी लासलगाव बाजार समितीत जाऊन आ. रोहित पवार, खा. भगरे, लासलगाव बाजार समितीचे माजी सभापती जयदत्त होळकर, उपसभापती संदीप दरेकर, संचालक सोनिया होळकर, सचिव नरेंद्र वाढवणे व डॉ. सुजित गुंजाळ यांच्याकडून कांदा उत्पादकांच्या व्यथा ऐकून घेतल्या.

अहिल्यानगरचे राष्ट्रवादी काँग्रेसचे खा. नीलेश लंके यांनी शासनाची धोरणे शेतकरीविरोधी असून, आता कांदा उत्पादकांच्या मागण्यांकरिता रस्त्यावर उतरून ताकद दाखवून देण्याची गरज आहे, असा इशारा दिला. दिंडोरीचे खा. भास्करराव भगरे यांनी गेल्या काही वर्षांत २२ वेळा निर्यातबंदी केली गेली. त्यामुळे गेल्या जानेवारीपासून मेअखेर विक्री झालेल्या कांद्यास दीड हजार रुपये अनुदान देण्याची मागणी केली. जयदत्त होळकर यांनी नाफेडमार्फत खरेदी करण्याची मागणी केली.

शरद पवार व अजित पवार यांनी नेहमीच कांदा उत्पादकांच्या प्रश्नावर आग्रही भूमिका घेतली, आता रोहित पवार यांनी कांदा उत्पादकांच्या व्यथा आपण मांडल्यात आणि कांद्याला किमान दोन हजार रुपये कायमस्वरूपी खरेदी करावी, अशी मागणी केली.

कांदा उत्पादकांनी आपल्या भावना व्यक्त कराव्यात, असे आवाहन आ. रोहित पवार यांनी करताच कांदा उत्पादक शेतकरी अल्पभूधारक शेतकऱ्यांनी सांगितले, की एक एकर कांद्याला साठ ते सत्तर हजार रुपये खर्च येतो; परंतु कांदा भाव कमी मिळतो. कर्जवसुलीचा त्रास दिला जातो. राहुल बहिरट यांनी केंद्र सरकारने कांदा उत्पादकांना भाव मिळणार नाही, अशी सोय शासनाने केली आहे, अशी टीका केली.

## पंचवटीच्या उशिराबद्दल खा. भगरे यांचे पत्र

**लासलगाव (भ्रमर वार्ताहर) :-** सकाळीच धावत असल्यामुळे चाकरमान्यांसाठी सोयीस्कर असलेल्या मनमाड ते मुंबई दरम्यान धावणाऱ्या पंचवटी एक्स्प्रेसला असंख्य वेळा उशीर होत आहे. सकाळच्या वेळेत वारंवार होत असलेल्या विलंबाबाबत खा. भास्कर भगरे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव व मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांकडे तातडीने पत्राद्वारे पाठपुरावा केला आहे.

पंचवटी एक्स्प्रेस ही हजारो प्रवाशांसाठी अत्यंत महत्त्वाची व लोकप्रिय रेल्वे सेवा मानली जाते. रोजंदारी करणारे कर्मचारी, विद्यार्थी, व्यापारी, वैद्यकीय उपचारासाठी मुंबईकडे जाणारे रुग्ण, तसेच इतर दैनंदिन प्रवासी मोठ्या प्रमाणावर या रेल्वेवर अवलंबून आहेत. गेल्या काही महिन्यांपासून ही गाडी सकाळच्या वेळेत सातत्याने उशिराने येत असल्याने प्रवाशांना मुंबईत उशिरा पोहोचल्यामुळे मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागतो. प्रवाशांना आर्थिक नुकसान, मानसिक तणाव व गाडी वेळेवर न पोहोचल्यास पुढील वेळापत्रक कसे सांभाळावे, याबाबत अडचणी येतात.



## रुग्णवाहिका सेवेच्या गुणवत्ता मानकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** भारत सरकारच्या आरोग्य क्षेत्र कौशल्य परिषद आणि 'बीव्हीजी इंडिया लिमिटेड' यांच्या संयुक्त विद्यमाने रुग्णवाहिका सेवा मानांकन निकषांनुसार देशातील पहिलाच मूल्यांकनकर्ता प्रशिक्षण कार्यक्रम पुण्यात यशस्वीरीत्या पार पडला. नुकत्याच झालेल्या या प्रशिक्षण उपक्रमात देशभरातील तज्ज्ञ, प्रशिक्षक आणि आपद्कालीन वैद्यकीय सेवा क्षेत्रातील प्रतिनिधींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

देशभरातील रुग्णवाहिका सेवांची गुणवत्ता अधिक सक्षम, परिणामकारक आणि रुग्णकेंद्री करण्याच्या उद्देशाने या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमातून प्रशिक्षित आणि प्रमाणित मूल्यांकनकर्त्यांची फळी तयार करण्यात आली असून, हे मूल्यांकनकर्ते देशातील विविध रुग्णवाहिका सेवांचे परीक्षण करून उच्च दर्जाची सेवा सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहेत.

कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे मुख्य अतिदक्षतातज्ज्ञ डॉ. प्रसाद राजहंस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपद्कालीन आरोग्य सेवांमध्ये गुणवत्ता, रुग्ण सुरक्षितता आणि प्रशिक्षित मनुष्यबळाचे महत्त्व अधोरेखित करीत अशा संरचित प्रशिक्षण कार्यक्रमांची गरज स्पष्ट केली. प्रशिक्षित मूल्यांकनकर्त्यांमुळे रुग्णवाहिका सेवांचा दर्जा अधिक उंचावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी भारत सरकारच्या हेल्थ सेक्टर स्किल कौन्सिल रुग्णवाहिका सेवा प्रदाता मानांकन निकष समितीचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर शेळके यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

आपत्कालीन वैद्यकीय सेवांमध्ये व्यवहार्य, संवेदनशील आणि परिस्थितीनुरूप मूल्यांकन प्रणालीची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. गुणवत्ता हमी, सातत्यपूर्ण सुधारणा आणि कार्यक्षम प्रतिसाद व्यवस्थेसाठी प्रशिक्षित मूल्यांकनकर्ते अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. आरोग्य क्षेत्रातील कौशल्य विकास, मानकीकरण आणि गुणवत्ता हमी अधिक सक्षम करण्यासाठी 'बीव्हीजी' सातत्याने कार्यरत असून, भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे देशातील आपद्कालीन आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम करण्याचा संकल्प संस्थेने व्यक्त केला.

## हजेरी प्रणालीविरोधात पशुवैद्यक संघटना, पशुचिकित्सा व्यवसायी संघटनेचा आक्षेप

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** महाराष्ट्र शासनाकडून पशुसंवर्धन विभागात लागू करण्यात येत असलेल्या एईबीएएस (आधार इनबिल्ड बायोमेट्रिक अटेंडिन्स सिस्टीम) प्रणालीविरोधात महाराष्ट्र राज्य राजपत्रित पशुवैद्यक संघटना व पशुचिकित्सा व्यवसायी संघटना यांनी तीव्र आक्षेप नोंदवत संयुक्तपणे एल्गार पुकारला आहे.

पशुसंवर्धन विभागातील अधिकारी व कर्मचारी हे प्रामुख्याने क्षेत्रीय स्वरूपाचे काम करत असून, दुर्गम व ग्रामीण भागात सेवा बजावत असतात. अशा परिस्थितीत मोबाईल-आधारित अथवा बायोमेट्रिक हजेरी प्रणालीची सक्ती करणे व्यवहार्य नसून, कर्मचाऱ्यांवर अन्यायकारक बंधने लादणारे ठरत असल्याची भूमिका दोन्ही संघटनांनी स्पष्ट केली आहे.

संघटनांच्या मते, आवास प्रणालीमुळे नेटवर्क अभाव, तांत्रिक अडचणी, मोबाईल नोंदणीची सक्ती, तसेच क्षेत्रीय दौरे व आपद्कालीन सेवांमध्ये अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. परिणामी विभागाच्या दैनंदिन कार्यक्षमतेवर, तसेच जनतेला दिल्या जाणाऱ्या पशुवैद्यकीय सेवांवर विपरित परिणाम होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर दोन्ही संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, तसेच सचिव, पशुसंवर्धन विभाग यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. या निवेदनाद्वारे एइएसबीए प्रणालीची सक्ती तत्काळ स्थगित करून विभागातील वस्तुस्थिती, क्षेत्रीय कामकाजाचे स्वरूप आणि कर्मचाऱ्यांच्या व्यावहारिक अडचणी लक्षात घेऊन पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे.

संघटनांनी शासनाला स्पष्ट इशारा दिला आहे, की कर्मचाऱ्यांच्या हिताविरुद्ध व अव्यवहार्य निर्णय जबरदस्तीने लागू करण्याचा प्रयत्न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन उभारण्यात येईल आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील. पशुसंवर्धन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी दोन्ही संघटना एकत्रितपणे अधिक तीव्र लढा उभारतील, असा निर्धार राज्य राजपत्रित पशुवैद्यक व पशुचिकित्सा व्यवसायी संघटनांनी व्यक्त केला.

## खड्ड्यांमुळे ज्येष्ठ नागरिकांसह सर्वसामान्य नागरिक त्रस्त

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** रस्ते दुरुस्तीसाठी खोदलेल्या खड्ड्यांमुळे ज्येष्ठ नागरिकांसह नागरिक त्रस्त झाले असून, पावसाळ्यापूर्वी रस्ते दुरुस्त करावेत, अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ नागरिकांसह विविध संघटनांच्या वतीने हुतात्मा स्मारक येथे आयोजित करण्यात आलेल्या परिसंवादामध्ये मान्यवरांनी व्यक्त केली.



रस्ते दुरुस्त झाल्यानंतर खड्डे तसेच ठेवणे, रस्ते दुरुस्ती करताना पाईपलाईन फुटून पाण्याचा अपव्यय होणे, खड्ड्यांभोवती सुरक्षा व नामदर्शक फलक नसल्यामुळे अपघात होण्याची शक्यता, एकाच वेळी नाशिक शहरातील रस्त्यांची कामे सुरू असल्यामुळे वाहनचालकांची कोंडी, खड्ड्यांच्या धुळीमुळे प्रदूषणात वाढ व नागरिकांच्या आरोग्याला धोका, नाशिक शहरात काही ठिकाणी रस्त्यांची कामे सुरू असताना ठेकेदार नसणे, रस्त्यांची कामे सुरू असताना पाण्याची पाईपलाईन फुटल्यावर संबंधितांवर कारवाई न करणे, रस्त्यावरील खड्ड्यांमुळे सर्व प्रकारच्या वाहनांच्या शॉकॲब्जॉर्बर परिणाम होणे व मनपाने पावसाळा सुरू होण्याच्या अगोदर रस्त्याची कामे पूर्ण न केल्यास पुन्हा एकदा नागरिकांना खड्ड्यांसारख्या प्रसंगाला तोंड द्यावे लागणार असल्याच्यादेखील प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या.

या परिसंवादामध्ये पद्माकर पाटील, रमेश कडलग, चंद्रकांत वाघोलीकर, हिरामण सोनवणे, राहुल बर्वे, भरत जैन, किशोर दीक्षित, बापू कुलकर्णी, काकड, अशोक कुलकर्णी, पंडित चंद्रात्रे, बोरसे बापू, कमलाकर वाणी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश कडलग यांनी केले. आभार चंद्रकांत वाघोलीकर यांनी मानले.

## उन्हाचा चटका वाढला

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** उन्हाचा चटका प्रचंड वाढला असून उष्णतेची लाट आणखी तीव्र झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून कमाल तापमानात सातत्याने वाढ होत असून, विदर्भातील तीन जिल्ह्यांनी तापमानाची सर्वोच्च पातळी ओलांडली आहे. वर्धा येथे सर्वाधिक ४६.५ अंश सेल्सिअस इतक्या उच्चांकी तापमानाची नोंद झाली. या वाढत्या उष्णतेमुळे नागपूर प्रादेशिक हवामान केंद्राने अकोला, अमरावती, यवतमाळ आणि वर्धा या जिल्ह्यांसाठी पुढील चार दिवस (२१ मेपर्यंत) उष्णतेच्या तीव्र लाटेचा 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये पारा ४५ अंश सेल्सिअसच्या वर गेला आहे. अकोला आणि अमरावती पाठोपाठ आता वर्धा शहरदेखील देशातील सर्वाधिक उष्ण शहरांच्या यादीत आले आहे.

## डॉ. आशिष रानडे यांच्या स्वरमैफलीने रसिक मंत्रमुग्ध

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** सकाळच्या धुंद अलवार वातावरणात कोवळ्या आणि तितक्याच प्रसन्न मधुर स्वरांनी रसिकांना अविस्मरणीय सुरांची अनुभूती मिळाली. स्वरांचं कोंदण घेऊन सूर तालाचेही वेगळेपण उपस्थितांना जाणवले.

शास्त्रीय संगीताच्या कलाकारांच्या आविष्काराला हक्काचे व्यासपीठ देण्यासाठी 'सूर विश्वास' या अनोख्या मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. डॉ आशिष रानडे यांच्या गायनाप्रसंगी रसिकांना हा अनुभव आला. डॉ. रानडे यांना सुजित काळे (तबला), अथर्व भागवत (संवादिनी), अथर्व ठाकूर (तानपुरा), दुर्वा प्रसाद (तानपुरा) व मल्हार रत्नपारखी (टाळ) यांची त्यांना साथसंगत लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्मिता मालपुरे यांनी केले.

विश्वास गार्डन, ठाकूर रेसिडेन्सी, विश्वास को-ऑप. बँकेसमोर, सावरकरनगर, गंगापूर रोड, नाशिक येथे हा कार्यक्रम संपन्न झाला.




स्वरांच्या गंभीर साधनेतून रागदारी संगीताचा अभिजात आविष्कार घडसति गायक डॉ. आशिष रानडे यांनी आपल्या बहारदार गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. रागांच्या सखोल मांडणीसह भाव, लय आणि स्वरांचा सुरेख संगम साधत त्यांनी सादर केलेली मैफल ही शास्त्रीय संगीताच्या समृद्ध परंपरेचा देखणा अनुभव ठरली.

मैफलीची सुरुवात त्यांनी गंभीर आणि चिंतनशील प्रकृतीच्या रामकली रागाने केली. विलंबित एकतालातील दरबार धावू मन की मुराद पाऊ या बडा ख्यालातून रागाचे गूढ आणि भारदस्त स्वरूप अत्यंत संयतपणे उलगडले. आलाप, बोलतान आणि तानांच्या रेखीव विस्तारातून रागातील आध्यात्मिकता आणि अंतर्मुख भावविश्व रसिकांसमोर जिवंत झाले. त्यानंतर द्रुत तीन तालांतील सागरी रेन के जागे या छोट्या ख्यालाने मैफलीत चैतन्याची लय निर्माण केली. वेगवान ताना व लयकारीतून त्यांच्या गायकीची ताकद आणि परिपक्वता प्रकर्षाने जाणवली. यानंतर त्यांनी वृंदावनी सारंग राग सादर करीत वातावरणात प्रसन्नतेचे आणि माधुर्याचे रंग भरले. मियाँ तानसेन यांची 'तुम रब तुम साहेब' ही झपतालातील बंदिश त्यांनी अत्यंत भावपूर्ण आणि नजाकतीने सादर केली. स्वरांच्या निर्मळ प्रवाहातून रागाचे भक्तिमय सौंदर्य खुलत गेले आणि रसिक अक्षरशः तल्लीन झाले.

मैफलीचा समारोप त्यांनी धन्य भाग सेवा का अवसर पाया या भैरवीने केला. भावस्पर्शी सादरीकरणातून भैरवीचे करुण, भक्तिमय आणि समाधानाचे स्वर वातावरणात दरवळले. संपूर्ण मैफलीत डॉ. रानडे यांच्या अभ्यासपूर्ण गायकीने आणि रागमांडणीतील संवेदनशीलतेने रसिकांना एका अभिजात सांगीतिक अनुभूतीचा अविस्मरणीय आनंद दिला. कलाकारांचा सन्मान उल्का मानकर, डॉ. गोविंद मालपुरे, भालचंद्र कुंटे, डॉ. सुधीर संकलेचा, महारुद्र अष्टुरकर व सुहासिनी बेळे यांच्या हस्ते करण्यात आले.

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेद्वारे ५३ हजार ६५६ ग्राहक वीज निर्माते

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी असलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला महावितरणच्या नाशिक परिमंडळात वीज ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत परिमंडळातील ५३ हजार ६५६ ग्राहकांनी सौर यंत्रणा आपल्या छतावर बसवून पारंपरिक विजेवरील अवलंबित्व कमी करत स्वतःच वीज निर्माते बनत १८७ मेगावॅट क्षमतेची वीज निर्मिती सुरू केली आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीसाठी महावितरणतर्फे जनजागृती करण्यात येत असून, या योजनेचा वीज ग्राहकांनी अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणच्या नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांनी केले आहे.

महिनाभरात तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्न मिळावे यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या या योजनेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. महावितरण अहिल्यानगर मंडळात एकूण २१ हजार ६५८ ग्राहक (क्षमता ७२.६५ मेगावॅट), मालेगाव मंडळात ४ हजार ४२६ ग्राहक (क्षमता १४.९७ मेगावॅट) तर नाशिक मंडळात २७ हजार ५७२ ग्राहक (क्षमता ९९.६९ मेगावॅट) अशा एकूण ५३ हजार ६५६ ग्राहकांची सौर यंत्रणा स्थापित झाली आहे. त्यातून एकूण १८७ मेगावॅट विजेची निर्मिती क्षमता आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत केंद्र सरकारकडून छतावरील सौर ऊर्जा निर्मितीचे रूफ टॉप सोलर प्रकल्प बसविणाऱ्या वीजग्राहकांना एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला ३० हजार रुपये, दोन किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला ६० हजार रुपये व तीन किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या प्रकल्पाला ७८ हजार रुपये अनुदान मिळते. हौसिंग सोसायट्यांनाही ५०० किलोवॅटपर्यंत प्रतिकिलोवॅट १८ हजार रुपये अनुदान मिळते. एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पातून सूर्यप्रकाशाच्या उपलब्धतेनुसार महिना अंदाजे १२० युनिट वीजनिर्मिती होते. छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पात निर्माण झालेली वीज घरामध्ये वापरायची, प्रकल्पात गरजेपेक्षा अधिक वीज निर्माण झाल्यामुळे वीजबिल शून्य येते, तसेच सौर ऊर्जेमुळे पर्यावरण रक्षणाला मदत होते, तसेच ग्राहकांनाही आर्थिक लाभ होतो. रूफ टॉप सोलर उभारणाऱ्या ग्राहकांना आवश्यक असणारे नेट मीटरसुद्धा मोफत लावण्यात येत असून त्याचप्रमाणे १० किलोवॅटपर्यंत क्षमतेसाठी त्वरित स्वयंचलित मंजुरी देण्यात येत आहे. या योजनेसाठी सवलतीच्या दरात बँकेकडून कर्जसुद्धा उपलब्ध आहे. वीजग्राहकांना https://www.pmsuryaghar.gov.in/ या संकेत स्थळावर योजनेची सर्व माहिती उपलब्ध आहे, तसेच नोंदणी करण्यासाठी पीएम सूर्यघर हे अत्याधुनिक मोबाईल ॲप उपलब्ध आहे. त्यावर नोंदणी केल्यानंतर छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी ग्राहकांना आपल्या पसंतीनुसार विक्रेता निवडता येतो. छतावर सौर ऊर्जा प्रकल्प बसविल्यानंतर अनुदान थेट ग्राहकांच्या खात्यात जमा केले जाते. यासंदर्भात अधिक माहितीसाठी महावितरणच्या कार्यालयात संपर्क साधावा आणि ग्राहकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

## आदिवासी गावांच्या विकासासाठी दोनदिवसीय कार्यशाळा संपन्न

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात आदिवासी गावांच्या विकासासाठी केंद्र शासनाच्या उन्नत भारत अभियानांतर्गत 'ग्रामपंचायत सूक्ष्म नियोजन प्रक्रिया' या विषयीची दोनदिवसीय कार्यशाळा झाली.


त्यात समाजकार्य महाविद्यालय, नाशिक व समाजकार्य विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील ३३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या अभियानाची महाराष्ट्र राज्यासाठी समन्वय संस्था असणाऱ्या छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा घेण्यात आली. या अभियानांतर्गत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने नाशिक जिल्ह्यातील पेठ तालुक्यातील घनशेत, कुळवंडी, आमलोण, गावंद व पळशी ही पाच गावे दत्तक घेतली




आहेत. विद्यापीठाच्या ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखेअंतर्गत घेण्यात आलेल्या या कार्यशाळेचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून समाजकार्य महाविद्यालय नाशिक येथील प्रा. प्रतिभा पगार उपस्थित होत्या. आपल्या उद्घाटनपर भाषणात बोलताना कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी उन्नत भारत अभियानाचा उदेश हा ज्ञानाचे उपयुक्त हस्तांतरण व समाजातील शेवटच्या घटकाचा विकास असल्याचे सांगितले. मुक्त विद्यापीठाच्या 'ज्ञानगंगा घरोघरी' या ब्रीदवाक्याप्रमाणे दत्तक गावातील प्रत्येक आदिवासी वस्ती, वाडे पाडे येथील घरोघरी जाऊन हे अभियान पोहोचवयाचे आहे. प्रास्ताविक ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखेचे संचालक प्रा. कैलास मोरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. दीपक सोनवणे यांनी केले. गोकुळ टोंगारे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी गणेश उमाळे यांनी परिश्रम घेतले. उन्नत भारत अभियान केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाचा अत्यंत महत्त्वाचा व महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. देशातील उच्च शिक्षण संस्थांनी आपल्याकडील ज्ञान व तंत्रज्ञान यांचा थेट फायदा ग्रामीण भारताच्या विकासासाठी करून देणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. अभियानाची सुरुवात दि. ११ नोव्हेंबर २०१४ रोजी करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित प्रत्येक शैक्षणिक संस्थांनी ग्रामीण भागातील किमान पाच गावांना समूह दत्तक घेणे आवश्यक आहे.

## संदीप आहेर यांना साहित्य सेवा कार्य गौरव पुरस्कार जाहीर

**निफाड (भ्रमर वार्ताहर) :-** ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था टाकळीभान (नेवासा) यांच्या वतीने देण्यात येणारा सन २०२६ चा



राज्यस्तरीय उत्कृष्ट मराठी अध्यापन व साहित्य सेवा कार्य गौरव पुरस्कार महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल, पालखेड (ता. निफाड) येथील संदीप आहेर यांना नुकताच जाहीर झाला आहे.

हा पुरस्कार सोहळा आज (दि. २०) टाकळीभान, नेवासा येथे आयोजित करण्यात आला आहे. चौथ्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात संमेलनाचे उद्घाटक महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष राजन लाखे, संमेलन अध्यक्ष कवयित्री, लेखिका समीक्षक डॉ. सुवर्णा चव्हाण- गुंड, स्वागत अध्यक्ष सहसंपादक परिषद कार्याध्यक्ष प्रकाश कुलथे, आ. विठ्ठलराव लंघे (नेवासा) आ. हेमंत ओगले (श्रीरामपूर) आणि इतर प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष अर्जुन राऊत, उपाध्यक्ष संदीप पटारे व सचिव मीननाथ निपुंगे यांनी दिली.

ग्रामीण साहित्य संमेलन हे नवोदितांच्या पंखात बळ भरणारे ठरावे, ज्यांनी अपूर्व असे साहित्यिक योगदान दिले, अशा साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील मराठी भाषेची सेवा केलेल्या मान्यवरांचा सन्मान सोहळा प्रबोधन मेळावा म्हणजेच हे ग्रामीण चौथे साहित्य संमेलन, त्यातच मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने मराठी साहित्यिकांना आणखी उभारी मिळणार आहे. या अनुषंगाने एकदिवसीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलनाच्या शब्द पंढरीमध्ये या पुरस्काराचे वितरण होणार आहे. या निवडीबद्दल महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गुलाब जोंधळे, उपाध्यक्ष निवृत्ती थेटे, कार्यकारी संचालक दीपक जोंधळे, कार्याध्यक्ष तथा सचिव दत्तात्रय जोंधळे, तसेच मुख्याध्यापक अशोक शेळके आदींनी अभिनंदन केले.

## पांडवलेणी परिसरात प्राणी पक्ष्यांसाठी पाण्याची सोय



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** सध्या कडक उन्हामुळे पशुपक्ष्यांना पाणी मिळणे कठीण झाले असून, अन्नपाण्यासाठी पशू, पक्षी व प्राणी वणवण भटकताना दिसत आहेत. पाण्यावाचून अनेकदा पक्षी-प्राण्यांचे जीवही जात आहेत. त्यांना जीवदान देण्यासाठी पांडवलेणी परिसरात सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने दाणापाण्याची सोय करण्यात आली आहे.

पांडवलेणी या थंड हवेच्या परिसरात चिमणी, कबुतरे, कावळा, कोकिळा, मोर, खारुताई व इतर पक्षी-प्राणी मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांच्यासाठी ठिकठिकाणी सिमेंट व मातीच्या भांड्यात पाणी व त्या शेजारी ज्वारी, बाजरी, तांदूळ, गहू व इतर धान्याचीही व्यवस्था करण्यात आली. विशेष म्हणजे पक्ष्याला व प्राण्यांना इजा झाल्यास प्रथमोपचार करून डॉक्टरांना बोलावले जाते. पक्षी, जनावरे, वृक्ष यांना तीव्र उन्हाळ्याचा त्रास जाणवणार नाही, याची खबरदारी घेतली जाते. यावेळी सुनील मटाले, अनिल पोटे, प्रकाश माळेकर, प्रतीक करडे, तेजल वैष्णव, अथर्व मटाले, दूर्वा पोटे, विनोद वैष्णव, सुधाकर टाव्हरे, बाळा धाकराव, रवींद्र अलई, सत्यजित शिंदे, दीपक दुधवाडे, रत्नाकर अलई, अनिकेत अलई, कल्पेश अलई, सविता अलई, वैशाली अलई, बाळा माथुरे, सारिका कुंभारे, अर्णव कुंभारे आदी उपस्थित होते.

# संपादकीय

## चिंता वाढविणारे हवामान

यंदा मान्सून केरळ किनारपट्टीवर तुलनेने लवकर थडकणार, ही बातमी खरे तर दिलासादायक ठरायला हवी. मात्र, त्याच वेळी मान्सूनवर विपरित परिणाम करणारा 'एल निनो'नामक घटकही आधीच्या अंदाजापेक्षा लवकर सक्रिय होणार असल्याने दिलासा वाटण्याऐवजी चिंता वाढली आहे. जून ते सप्टेंबरदरम्यान हमखास पडणारा मोसमी पाऊस म्हणजेच मान्सून हे भारताचे ठळक वैशिष्ट्य. आजही देशाची अर्थव्यवस्था मोठ्या अंशी मान्सूनवरच अवलंबून आहे. सागरी पृष्ठभागाचे तापमान, तेथील दाब, वारा आदी विविध घटकांवर असलेला पाऊस हवामानाप्रमाणेच लहरी. त्यामुळे तो कधी जोरात बरसतो, तर कधी पाठ फिरवतो. तो जोरात झाल्यास शेतात आणि बाजारपेठेत चैतन्य निर्माण होते; अन् पुरेसा न झाल्यास तोंडचे पाणी पळते. यंदाच्या मान्सूनवर सावट आहे, ते 'एल निनो'चे. प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान वाढल्यामुळे हा घटक सक्रिय होतो आणि त्यामुळे दक्षिण अमेरिकेत अतिवृष्टीची, तर भारतात अवर्षणाची शक्यता निर्माण होते. या वर्षी 'एल निनो' सक्रिय होणार याची कल्पना असल्याने हवामान विभागाने आधीच 'दीर्घकालीन सरासरी'पेक्षा कमी म्हणजे ९२ टक्के पावसाचा अंदाज वर्तविला आहे. हा 'एल निनो' जूनमध्येच सक्रिय होणार असल्याने आणि प्रशांत महासागराचा पृष्ठभाग दोन अंश सेल्सिअसपेक्षाही अधिक तापण्याची भीती असल्याने अवर्षणाची शक्यता आणखी वाढली आहे. त्यामुळे यंदाचा पावसाळा चिंताजनक आणि आव्हानात्मक असू शकतो. विषुववृत्तीय प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान सरासरीपेक्षा ०.५ अंश सेल्सिअसने अधिक असल्याकडे हवामान शास्त्रज्ञ लक्ष वेधत आहेत. हे वाढीव तापमान म्हणजे 'एल निनो' अपेक्षेहून अधिक लवकर सक्रिय होण्याचे लक्षण. आधीच्या वर्षातील तापमान कमी होण्याचे आणि ते परत वाढण्याचे चक्र यंदा अधिक वेगाने फिरत असून, ही असामान्य घटना असल्याचे मानले जाते. याचा अर्थ 'एल निनो' अधिक तीव्र असणार. प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान १.५ अंश सेल्सिअसहून अधिक झाल्यास 'एल निनो' तीव्र झाला, असे मानले जाते. त्या स्थितीस 'सुपर एल निनो'ही म्हणतात. ही घटना प्रशांत महासागरातील असली, तरी तिचे हवामानशास्त्रीय परिणाम साऱ्या जगावर होतात. यामुळे दक्षिण अमेरिकी देशांत अतिवृष्टी होऊन पूर येण्याची, त्यात पिके वाहण्याची आणि मानवी संकट गडद होण्याची भीती असते; तर भारतात मोसमी पाऊस कमी होतो, अनेक ठिकाणी तो बरसतच नाही, तापमान वाढते; त्यामुळे पाण्याच्या दुर्भिक्ष्याची, पिके न येण्याची आणि महागाईची शक्यता अधिक असते. या शक्यता लक्षात घेऊन उपाययोजना आखण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे आपद्कालीन उपायांबद्दल भरभरून बोलले जात असले आणि कागदावर योजना आखल्या गेल्या असल्या, तरी प्रत्यक्षात त्यांची व्यवस्थित अंमलबजावणी होत नाही, असा आजवरचा अनुभव आहे.

## 'आर्ट ऑफ लिव्हिंग' म्हणजे वैश्विक बंधुभावाचे प्रेरणादायी केंद्र : प्रा. राम शिंदे

**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** येथील आर्ट ऑफ लिव्हिंग आश्रम म्हणजे शांतता, अध्यात्म, मानवता आणि वैश्विक बंधुभावाचे प्रेरणादायी केंद्र आहे. येथे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मानसिक शांती, सकारात्मक ऊर्जा आणि आध्यात्मिक समाधानाचा अनुभव मिळतो. गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या नेतृत्वाखाली 'द आर्ट ऑफ लिव्हिंग' ही संस्था आज जगभरात मानवी मूल्यांची चळवळ बनली आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले. गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी पुष्पहार, शाल, श्रीफळ आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची प्रतिमा देऊन त्यांचा सत्कार केला, त्याप्रसंगी प्रा. शिंदे बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी गुरुदेवांच्या आध्यात्मिक, सामाजिक आणि राष्ट्रीय कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करीत त्यांच्या मानवतेसाठीच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या नेतृत्वाखाली 'द आर्ट ऑफ लिव्हिंग' ही संस्था आज जगभरात मानवी मूल्यांची चळवळ बनली असून, ध्यान, सुदर्शन क्रिया, सेवा, सत्संग आणि आध्यात्मिक ज्ञानाच्या माध्यमातून लाखो लोकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

समाजात वाढत असलेला ताणतणाव, हिंसा आणि विभाजनाच्या पार्श्वभूमीवर गुरुदेवांनी शांतता, संवाद आणि अंतर्मनातील परिवर्तनाचा मार्ग जगाला दाखविला आहे. 'वसुधैव कुटुंबकम्' या भारतीय संस्कृतीच्या संदेशाला त्यांनी जागतिक स्तरावर पोहोचविले, असे गौरवोद्गारही महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. शिंदे यांनी काढले.

यावेळी त्यांनी अहमदनगरचे 'अहिल्यानगर' असे नामकरण करण्यामागे गुरुदेवांनी दिलेल्या सूचनेचाही विशेष उल्लेख केला. लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यास अभिवादन



करण्यासाठी हे नामांतर ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महायुती सरकारच्या कार्यकाळात या मागणीची पूर्तता आणि अंमलबजावणी झाल्याचे त्यांनी यावेळी अभिमानाने नमूद केले.

सभापती प्रा. राम शिंदे यांनी पुण्यात झालेल्या 'अंतर्नाद' या ऐतिहासिक संगीत मैफलीची आठवण करून दिली. 'वंदे मातरम्'च्या सामूहिक गायनाचा जागतिक विक्रम प्रस्थापित करणाऱ्या या कार्यक्रमाचे आपण प्रत्यक्ष साक्षीदार ठरलो, असे त्यांनी सांगितले. भाजपचे ज्येष्ठ दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्या माध्यमातून त्या ऐतिहासिक क्षणांचा अनुभव घेण्याचे भाग्य लाभल्याचेही त्यांनी नमूद केले. देशात आणि जगात शांतता, समृद्धी व सद्भावना नांदो, अशी प्रार्थना करीत गुरुदेव श्री श्री रविशंकर यांना मानवतेसाठीच्या नि:स्वार्थ सेवेसाठी त्यांनी मन:पूर्वक धन्यवाद दिले.

## सुकाकाथ मसाला

### बिगरतिकीट

एक साधू महाराज रेल्वेत बसले. ''काय महाराज? कुठे निघालात?'' टीसीने महाराजांना विचारले. ''जिथं रामाचा जन्म झाला जिथं जायचं आहे,'' महाराज म्हणाले. ''तिकीट काढलं आहे काय?'' टीसीने विचारले. महाराज म्हणाले, ''नाही,''

''चला तर मी तुम्हाला जिथं कृष्णाचा जन्म झाला आहे तिथं पाठवतो,'' टीसी निर्विकारपणे म्हणाला.

– पानवाला

## खाण्यासाठी चेंज हवा?

### तोंडल्यांची परतून भाजी

**साहित्य :–** तोंडली धुऊन स्वच्छ केलेली, दीड टेबल स्पून धणा, जिरा पावडर, अर्धा टी स्पून आमचूर पावडर, पाव टी स्पून हळद, पाऊण टी स्पून लाल तिखट, मोठ्या दोन चिमटी भरून कसूरी मेथी, २–३ टेबलस्पून तेल, चवीपुरते मीठ, चिमूटभर मोहोरी व चिमूटभर जिरे, हिंग.

**कृती :–** एकाच्या ४ लांब फोडी किंवा चकत्या कराव्या, तेल तापवून त्यात मोहोरी, जिरे व हिंग घालून खमंग फोडणी करावी, यात हळद व बाकी सगळे मसाले (कसूरी मेथी व मीठ सोडून) घालून मसाले थोडे तेलात परतले की तोंडली घालावी. झाकण देऊन एक वाफ आणावी. भाजीत आता मीठ व कसूरी मेथी घालावी व झाकण न ठेवता भाजी छान खरपूस होईपर्यंत परतून शिजवावी तेल, मसाल्यामध्ये मस्त फ्राय झालेली चटपटीत तोंडली तयार आहे, गरम गरम भाजी व फुलके किंवा साधे वरण भात फार टेस्टी लागते.

– **ऐश्वर्या राजेंद्र काळे**

## हॉटेल उद्योगात व्होकेशनल डिप्लोमाला वाढता प्रतिसाद

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** भारतातील हॉस्पिटॅलिटी (आतिथ्य) क्षेत्र झपाट्याने विस्तारत असताना, हॉटेल उद्योगाला प्रशिक्षित मनुष्यबळाची मोठी कमतरता जाणवत आहे. भरतीतील तूट, उच्च ॲट्रिशन (कामगार गळती) आणि तत्काळ कामासाठी तयार उमेदवारांची गरज लक्षात घेता, 'डायरेक्ट प्लेसमेंट' आधारित 'हॉस्पिटॅलिटी व्होकेशनल डिप्लोमा पाथवे' हा प्रभावी आणि व्यावहारिक पर्याय म्हणून पुढे येत आहे.



हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात केवळ व्यवस्थापक किंवा वरिष्ठ तज्ज्ञांचीच नव्हे, तर शिस्तबद्ध, सेवा–केंद्रित आणि ऑपरेशन्सशी पटकन जुळवून घेणाऱ्या प्रवेशस्तरीय कर्मचाऱ्यांची मोठी गरज असते. विविध बाजारपेठांमध्ये कुशल–अकुशल श्रेणीत ३० ते ४० टक्क्यांपर्यंत मनुष्यबळाची कमतरता जाणवत असल्याने उद्योग असंघटित भरतीऐवजी संरचित वर्कफोर्स पाईपलाईनकडे वेगाने वळत आहेत.

या मॉडेलमध्ये उमेदवारांना सुरुवातीपासूनच प्रत्यक्ष हॉटेलमध्ये कामाची संधी मिळते. उमेदवार थेट नोकरीला सुरुवात करतात आणि त्याच वेळी ग्रुमिंग, वर्कप्लेस रेडीनेस (कामाच्या ठिकाणी तयारी) तसेच संरचित व्होकेशनल डिप्लोमा फ्रेमवर्कअंतर्गत टप्प्याटप्प्याने प्रगती करतात. त्यामुळे उद्योगाला तात्काळ उपयुक्त कर्मचारी मिळतात आणि उमेदवारांना प्रत्यक्ष अनुभवासह करिअरची मजबूत दिशा मिळते. अधिक माहितीसाठी या नंबरवर व्हॉट्सॲप ९७६९५५९८५५ किंवा ९७६९७६१०९९ या क्रमांकावर संपर्क साधावा किंवा कॉल करावा.

हा कार्यक्रम स्टार युनिॲडवाईस या शिक्षण व करिअर पाथवे क्षेत्रातील अनुभवी संस्थेमार्फत समर्थित व कार्यान्वित केला जात आहे. उमेदवार मोबिलायझेशन, स्क्रिनिंग, चॅनल ॲक्टिव्हेशन, अंमलबजावणी व देखरेख यामध्ये संस्था सक्रिय भूमिका बजावत असून, हा मॉडेल विविध भागांमध्ये प्रभावीपणे राबविणे शक्य होत आहे.

## वणी येथे बहुजन हक्क निर्धार परिषद उत्साहात

**वणी (भ्रमर वार्ताहर) :–** शिक्षण क्षेत्राचे वाढते खासगीकरण आणि शिक्षणाचा होत असलेला बाजार यावर बोलताना शिक्षण हे सर्वसामान्यांचे मूलभूत अधिकार असून, सरकारने ते भांडवलदारांच्या दावणीला बांधले आहे. गरीब, शेतकरी, कामगार आणि बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणापासून दूर ठेवण्याचा हा अप्रत्यक्ष प्रयत्न आहे, असा दावा वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी केला. यावेळी त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या विविध धोरणांवर जोरदार टीका केली.



दिंडोरी तालुका वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आयोजित बहुजन हक्क निर्धार परिषदेत ते वणी येथील खुशी बँक्वेट हॉलमध्ये बोलत होते. बहुजन समाजाचे हक्क, सामाजिक न्याय, संविधानिक मूल्यांचे संरक्षण आणि संघटनात्मक बांधणी या मुद्द्यांवर परिषदेत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. परिषदेला तालुकाभरातून युवा कार्यकर्ते, महिला आघाडी, सामाजिक संघटना तसेच बहुजन विचारांचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्य प्रवक्त्या दिशा पिंकी शेख यांनी सरकारच्या धोरणांवर सडकून टीका करीत बेरोजगारी, महागाई, सामाजिक विषमता आणि संविधानिक संस्थांवरील दबाव यांसारख्या विषयांवर भाष्य केले. महिलांनी सामाजिक आणि राजकीय चळवळीत मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जिल्हाध्यक्ष चेतन गांगुर्डे यांनी दिंडोरी तालुक्यातील स्थानिक प्रश्न मांडले. माजी उपसरपंच किरण गांगुर्डे यांचेही भाषण झाले.

युवा आघाडीचे जिल्हा महासचिव संविधान गांगुर्डे यांनी परिषदेमागील भूमिका स्पष्ट करताना बहुजन समाजाच्या एकजुटीतून सामाजिक न्यायाची लढाई अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला.

परिषद यशस्वी करण्यासाठी तालुकाध्यक्ष बाळासाहेब शेजवळ, जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत अहिरे, युवा महासचिव विकी दुर्धवळे, शहराध्यक्ष तुषार मोरे, उपाध्यक्ष संकेत गांगुर्डे, समाधान शिरसाठ, विशाल गांगुर्डे, दादा मोरे आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## भ्रमर शब्दकोडे क्र.४४३

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | ■ | ■ | ४ | ५ | | ६ | ■ |
| | ■ | | ■ | | ■ | ७ | | | ■ | ८ | ९ |
| १० | | ■ | ११ | | | | ■ | १२ | १३ | ■ | |
| | ■ | १४ | ■ | | ■ | ■ | १५ | ■ | १६ | १७ | |
| ■ | १८ | ■ | १९ | | | ■ | २० | २१ | | | ■ |
| २२ | | २३ | | ■ | ■ | २४ | | | ■ | २५ | |
| | ■ | २६ | | २७ | ■ | | ■ | २८ | २९ | | ■ |
| | ■ | ■ | ३० | | ३१ | ■ | ३२ | ■ | | ■ | ३३ |
| ३४ | ३५ | ३६ | | ■ | ३७ | ३८ | | ■ | ३९ | | |
| ४० | | | ■ | ■ | ■ | | ■ | ४१ | | ■ | |
| ■ | ■ | ४२ | | ४३ | ४४ | | ■ | ४५ | | ४६ | ■ |
| ४७ | | | ■ | ४८ | | ■ | ४९ | | ■ | ५० | |

**उभे शब्द :** १) आपले राज्य २) राज्यातील रयत, लोक ३) ऐंशीच्या दशकातील अभिनेता व एक माजी खासदार ४) छोटा सरपटणारा एक जीव ५) राक्षस ६) रांग, रव ७) बातमी, खबर ९) आडातून पाणी उपसण्यासाठी बनविलेले पूर्वीचे चक्राकार साधन १३) पश्चिम महाराष्ट्रातील एक जिल्हा १५) जनक राजाची कन्या, सीता १७) वृत्तपत्रामध्ये बातम्या लिहिणारा १८) एक म्हण-** तेथे माती १९) एखाद्या सामाजिक कामासाठी स्वत:जवळचे पैसे खर्च करणे २१) तोंड, मुख २२) सह्याद्री रांगेतील एक मुख्य किल्ला २३) चार आणि तीन मिळून होणारी संख्या २४) दह्यात पाणी मिसळून बनवितात ते २७) दस उलट लिहा २९) खर्चात केलेली बचत ३१) बशीचा जोडीदार ३२) जुनाच्या विरूध्दार्थी ३३) भगवान शंकराच्या हातातील वाद्य ३५) बड उलट लिहा ३६) शक्तीमान, ताकदवान ३८) ताणला जाणारा एक लवचिक पदार्थ ४१) उडिदाच्या पिठापासून बनविलेला कुरकुरीत पदार्थ ४३) एसटीची प्रवासी गाडी ४४) फळातील आतील गर ४६) जरचा जोडीदार

**आडवे शब्द :** १) भारतातील एक राज्य ४) नाशिक जिल्ह्यातून वाहणारी महाराष्ट्रातील मोठी नदी ७) श्रीविष्णूचा एक अवतार ८) एक म्हण-बडा ** पोकळ वासा १०) किंग (मराठीत) ११) संकट दूर करणारा या अर्थाने श्रीगणेशाचे एक नाव १२) एखाद्या कार्याचा घेतलेला ध्यास १४) आमीर खान अभिनीत एक चित्रपट-* इडियट्स १६) स्वभावाने रागीट १९) छ. शिवराय या गडावर असताना सिद्दी जौहरने गडाला वेढा टाकला होता २०) दुर्गामाता उत्सवाचे नऊ दिवस २२) केलेल्या कामाला मिळणारी दाद, उमटणारे परिणाम २४) बजावून सांगणे, *** देणे २५) एक म्हण-दाम करी ** २६) एक जंगली हिंस्त्र पशू २८) नाही म्हणणे ३०) श्रीगणेशाचा आवडता नैवेद्य ३४) घाई, लगबग, घोटाळा ३७) कालच्या अगोदरचा दिवस ३९) शपथ (हिंदीत) ४०) दुप्पट (इंग्रजीत) ४२) परीक्षेत उत्तीर्ण होणे ४२) पटाईत, तरबेज ४५) माघारी देणे अथवा माघारी येणे ४७) एक म्हण- *** तोंडी मोठा घास ४८) राजकीय पक्षांचा मेळावा, भास उलट लिहा ४९) एक म्हण-इकडे ** तिकडे विहीर ५०) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत)

### शब्दकोडे क्र. ४४२ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्वा | भि | मा | न | ■ | र | य | त | ■ | प्र | हा | र |
| तं | ■ | ल | ग | ब | ग | ■ | हा | व | भा | व | ■ |
| त्र्य | ■ | क | र | ■ | ड | झ | न | ■ | क | ■ | ■ |
| दि | ड | ■ | ■ | सा | ■ | रो | ■ | द | र | वे | शी |
| न | ग | रा | ध्य | क्ष | ■ | का | ल | वा | ■ | ग | त |
| ■ | म | स | ■ | र | सा | ■ | स | खा | ■ | ■ | ■ |
| सु | गी | ■ | ■ | ■ | म | त | ■ | ना | म | दा | र |
| ल | त | ■ | खा | स | दा | र | ■ | ■ | का | र | ण |
| ता | ■ | क | की | ■ | म | ■ | न | वी | न | ■ | गा |
| न | व | स | ■ | ■ | दं | ड | व | त | ■ | वा | डा |
| ■ | रा | व | स | ■ | ड | ब | ल | ■ | रा | म | ■ |
| सिं | ह | ■ | सा | त | ■ | र | ■ | ■ | स | न | ई |

## अधिकारी, कर्मचारी यांच्या उत्तम सेवेमुळेच बँकेचा लौकिक : निवृत्ती अरिंगळे

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** यश हे नेहमी सामुदायिक प्रयत्नातून मिळते. ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या उत्तम सेवेमुळेच बँकेचा आणि कर्मचाऱ्यांचा लौकिक वाढतो. सांघिक भावना व सेवाभाव यांच्या बळावरच बँक स्पर्धेच्या युगात टिकून राहते, असे प्रतिपादन नाशिकरोड–देवळाली व्यापारी सहकारी बँकेचे अध्यक्ष निवृत्ती अरिंगळे यांनी केले. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सत्काराप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कर्मचाऱ्यांचे कुटुंबीयही उपस्थित होते.



नाशिकरोड देवळाली व्यापारी बँकेच्या ३१ शाखांचा कौतुक सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी उत्कृष्ट शाखा, अधिकारी, कर्मचारी, तसेच विविध विभागांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना अरिंगळे यांनी सांगितले, की बँकेने यंदा १३८० कोटी रुपयांचा व्यवसाय पूर्ण केला असून, आता १७६९ कोटी रुपयांचे नवे लक्ष्य समोर ठेवण्यात आले आहे. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी सर्वांचे योगदान महत्त्वाचे ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाला बँकेच्या उपाध्यक्षा कमल आढाव, ज्येष्ठ संचालक दत्ता गायकवाड, मनोहर कोरडे, सुधाकर जाधव, योगेश नागरे, दिनकर आढाव, नितीन खोले, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी एकनाथ कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्य कार्यकारी अधिकारी एकनाथ कदम यांनी बँकिंग क्षेत्रातील वाढती स्पर्धा लक्षात घेऊन टीमवर्कच्या बळावर काम करण्याची गरज अधोरेखित केली. बँकेने ८०६ कोटी रुपयांच्या ठेवी आणि ५८४ कोटी रुपयांचे कर्जवाटप करीत १३८० कोटी रुपयांचा व्यवसाय साध्य केला आहे. पुढील एका वर्षात ४०० कोटी रुपयांची व्यवसायवृद्धी करण्यासाठी सर्वांनी सज्ज व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी उत्कृष्ट कामगिरीबद्दल विविध शाखा व कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. उत्कृष्ट शाखा म्हणून इंगळेनगर, सौभाग्यनगर आणि जुना सायखेडा रोड शाखांना सन्मानित करण्यात आले. उत्कृष्ट शाखा व्यवस्थापक पुरस्कार कविता शिरसाठ, मंगेश फडोळ आणि दीपक वाजे यांना प्रदान करण्यात आला. सर्वाधिक ठेवी संकलनासाठी नाशिकरोड शाखेचा गौरव करण्यात आला, तर ठेवी विभागात पवननगर शाखा आणि सिन्नर फाटा शाखेने विशेष कामगिरी केली. उत्तम डिजिटल सेवा पुरस्कार सिन्नर फाटा व हॉटेल जत्रा शाखांना देण्यात आला.

उत्कृष्ट अधिकारी म्हणून ललित भोर आणि विवेक हांडोरे यांचा सन्मान करण्यात आला. उत्कृष्ट लिपिक म्हणून हेमा माळवे, तर उत्कृष्ट शिपाई म्हणून भरत गायकवाड आणि तुषार दोंदे यांचा गौरव करण्यात आला. ग्राहकांचे जादा पैसे प्रामाणिकपणे परत केल्याबद्दल प्रदीप कलंत्री, सुनील धोंगडे, राहुल कोठुळे, प्रवीण पाटील आणि विजय तुपलोंढे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला संचालक जगन्नाथ आगळे, सुनील आडके, विलास पेखळे, श्रीराम गायकवाड, वसंत अरिंगळे, गणेश खर्जुल, अरुण जाधव, अशोक चोरडिया, रमेश धोंगडे, ॲड. सुदाम गायकवाड, मनोहर बुचडे, श्रीकांत हांडोरे, नंदकुमार बकरे, खंडेराव भागवत, शरद वालझाडे, भरत भोई, खंडेराव मुठाळ, सुधीर हिंगमिरे, सुनील राठी, अशोक गायकवाड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता भागवत आणि राजश्री तुपे यांनी केले.

## एम बँकेला मिळाला स्वत:चा यूपीआय हॅण्डल

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** सकाळी पेपर विकत घेण्यापासून ते महिन्याच्या घरभाड्यापर्यंत, आजकाल सगळेच ऑनलाईन भरता येते. मग अशातच ॲपची बदलाबदली, अनेक आयडीमुळे उडणारी धांदल आणि विविध प्लॅटफॉर्म्सवरील छुपे शुल्क हे आजही चालूच आहे. हा गोंधळ संपविण्यासाठी एमबँकने थेट स्वत:चे यूपीआय हॅण्डल @एमबँक सुरू केले आहे.



बहुतांश फिनटेक कंपन्या आणि बऱ्याच सहकारी बँका इतर बँकांच्या नावावर चालणाऱ्या यूपीआय हॅन्डल्सवर अवलंबून आहेत; मात्र एमबँकने हा साचा मोडत स्वत:ची वेगळी ओळख तयार केली आहे. स्वत:चे यूपीआय हॅण्डल सुरू करणारी ही देशातील एकमेव नॉन–शेड्यूल्ड अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक ठरली आहे.

आता चहाचे पैसे असोत, भाजीवाल्याचे बिल, मित्रांना पैसे पाठविणे किंवा महिन्याचा किराणा. सगळ्या व्यवहारांसाठी आता एकच, लक्षात राहणारे थेट एमबँक बँकेचे हॅण्डल वापरता येणार आहे.

लोकांना यूपीआय वापरायला आवडते; पण गोंधळ नको असतो. त्यांना हवे असते सरळ, सोपे आणि विश्वासार्ह व्यवहाराचे साधन. @एम बँक अशाच सुरक्षित आणि सहज बँकिंगची हमी देते.

एमबँकचे अध्यक्ष तन्वीर इनामदार म्हणाले, की एमबँक हॅण्डल सर्व यूपीआय ॲप्सवर सहज वापरता येते. वैयक्तिक आणि व्यावसायिक व्यवहारांसाठी पटकन ओळखू येणारे हॅण्डल आणि बँकेचा थेट विश्वास, हे या हॅण्डलचे प्रमुख फायदे आहेत.

@एमबँकच्या हॅण्डलमुळे डिजिटल बँकिंग अधिक सोपे परिचयाचे आणि वैयक्तिक झाले आहे. डिजिटल व्यवहारांच्या बाबतीत जगाचे लक्ष भारताकडे असताना, यात आपला हातभार लावत एम बँक आपल्या ग्राहकांना वेगवान, विश्वासार्ह आणि आधुनिक सेवा देऊन आपली अशी एक खास ओळख निर्माण करीत आहे. @एमबँक यूपीआय हॅण्डल आता सर्व एमबँक ग्राहकांसाठी उपलब्ध आहे. एम बँकेचे हे पाऊल डिजिटल बँकिंगची नाळ सामान्य जनतेच्या रोजच्या गरजांशी जोडणारे असेल.

● **नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** मखमलाबाद परिसरात गेल्या तीन दिवसांपासून पाणी न आल्यामुळे मोठी गैरसोय झाली. अनेक ठिकाणी महिलांना हंडाभर पाण्यासाठी वणवण फिरावे लागले; मात्र पाणी मिळत नसल्याने नाराज व्हावे लागले.

## उबेर बाईक चालकाने केला तरुणीचा विनयभंग

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** उबेर कंपनीमार्फत ऑनलाईन बुकिंग केलेल्या बाईकचालकाने प्रवासी तरुणीचा विनयभंग केल्याचा प्रकार नाशिकरोड येथे घडला. फिर्यादी तरुणीने उबेर कंपनीच्या मार्फत ऑनलाईन बुकिंग केली होती. त्यादरम्यान एमएच १५ जीझेड २८६८ या क्रमांकाच्या बाईकवरील चालक आरोपी हेमंत चव्हाण याने फिर्यादीशी जवळीक निर्माण करण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या स्त्रीमनास लज्जा उत्पन्न होईल, असे बोलणे व कृत्य करून तिचा विनयभंग केला, तसेच पीडितेला वारंवार फोन करून भेटण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात संशयित हेमंत चव्हाण याच्याविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शेजवळ करीत आहेत.

# शेतमजुराने दिली बिबट्याशी झुंज



**दिंडोरी (भ्रमर वार्ताहर)** :- तालुक्यातील ओझे येथे ६० वर्षांच्या शेतमजुराने सतत तब्बल दहा मिनिटे बिबट्याशी झुंज देऊन आपले प्राण वाचविले. त्यांनी बिबट्याशी झुंज दिल्याबद्दल त्यांचे परिसरातून कौतुक होत आहे.

ओझे येथील बाळू धोंडीराम धुळे हे शेतमजूर प्रवीण शिंदे यांच्या उसाला पाणी देण्यासाठी गेले असता उसाच्या सऱ्या भरल्या की नाहीत, हे पाहत असताना अचानक बिबट्याची मादी उसातून त्यांच्यासमोर येऊन उभी राहिली व मोठमोठ्या डरकाळ्या फोडू लागली. धुळे हे भयभीत झाले असतानाच बिबट्याने त्यांच्या अंगावर उडी मारली; मात्र त्याच वेळेस धुळे खाली बसले व काठी फिरवीत राहिले. बिबट्याची झेप त्यांच्यापासून पुढे जाऊन पडली. मादी पुन्हा त्यांच्यासमोर येऊन मोठमोठ्याने आवाज करू लागली. जवळजवळ तीन वेळेस बिबट्याने त्यांच्यावर धाव घेऊन त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला; मात्र धुळे हे शेतमजूर चपळ असल्यामुळे त्यांनी बिबट्याला आपल्या अंगावर पडू दिले नाही. वयाची साठी ओलांडलेल्या माणसांने बिबट्याशी दहा मिनिटे झुंज देऊन आपले प्राण वाचविले. या घटनेविषयी बोलताना धुळे यांनी सांगितले, की मी जवळजवळ संपलो म्हणूनच बिबट्याशी झुंज देत राहिलो. मनातून आपण आता येथे संपणार आहे, असे मनात ठसले होते; मात्र थोड्याच वेळात बिबट्याच्या मादीच्या पिल्लांची हालचाल उसाच्या शेतात चालू झाली. त्यामुळे त्या मादीचे लक्ष विचलित झाले व तिने आपल्या बछड्यांना पाहण्यासाठी तोंड फिरवून घेतले. त्याच वेळेस झुंज देऊन थकलेल्या बाळू धुळे यांनी जोरात धूम ठोकली.

त्यावेळी त्यांनी समोर काटेरी झाडेझुडपे यांचा विचार न करता तेथून बाहेर पडले. पळत असताना हात-पाय, डोक्याला अनेक ठिकाणी काटे टोचले; मात्र जीव वाचविण्यासाठी धुळे यांनी लांब सुरक्षित जाण्याचा प्रयत्न केला व तो यशस्वी झाला. या घटनेनंतर उसाच्या शेतात पाणी भरण्यासाठी मजूर जाण्यास तयार नाहीत. त्यामुळे उसाला पाणी कसे द्यायचे? असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे निर्माण झाला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या परिसरात बिबट्याने शेळ्या, मेंढ्या, कुत्रे, मांजरे आदींसह अनेक पाळीव प्राण्यांवर हल्ले करून ठार केले आहे. त्यामुळे शेतकरी व शेतमजुरांमध्ये दहशत कायम आहे. या परिसरात बिबट्या व त्यांच्या बछड्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढत असल्यामुळे शेतात काम करणारे शेतमजुरांवर परिणाम होऊन कोणी कामास येण्यास तयार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना स्वत:लाच शेतीची कामे करावी लागत आहेत.

त्यामुळे वनविभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन या परिसरात बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी तातडीने पिंजरे लावण्यात यावेत, अशी मागणी होत आहे.

> गेल्या अनेक वर्षांपासून उसाच्या शेतात बिबट्यांचा मोठ्या प्रमाणात वावर असून अनेक वेळा याच बिबट्याने दर्शन दिले होते; मात्र याआधी हा बिबट्या माणसांवर चाल करीत नव्हता; परंतु आज बिबट्या अचानक अतिशय खवळलेला दिसला व त्याने माझ्या अंगावर तीन वेळा हल्ला करण्याचा प्रयत्न केला; मात्र माझ्या एका हातात काठी व दुसऱ्या हातात विळा असल्यामुळे तो अंगावर जास्त चाल करू शकला नाही. त्यामुळे मी बिबट्याच्या तावडीतून थोडक्यात वाचलो. शेवटी असे म्हणता येईल, की 'देव तारी त्याला कोण मारी'.
>
> – **बाळू धुळे,** शेतमजूर, ओझे



# भाजयुमोतर्फे छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा, नाशिक शहर यांच्या वतीने डिंगर आळी, जुने नाशिक येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून व पुष्पांजली वाहून त्यांना अभिवादन करण्यात आले.

भाजयुमोचे शहराध्यक्ष प्रवीण भाटे आपल्या भाषणात संभाजी महाराजांबद्दल गौरवोद्गार काढताना म्हणाले, की शंभूराजांनी ज्या खंबीरपणे अत्याचाराला सामोरे जात स्वधर्माचे रक्षण केले, ते पाहून प्रत्येक हिंदूच्या मनात अभिमानाची भावना दाटून येते. त्यांच्या बलिदानाची आठवण आपल्याला सदैव देशाप्रति, धर्माप्रति व समाजाप्रति कर्तव्याची जाणीव करून देते. या प्रसंगी भारतीय जनता युवा मोर्चाचे सरचिटणीस प्रशांत वाघ, निखिल खोडे, पवन उगले, उपाध्यक्ष अजिंक्य फरांदे, तुषार नाटकर, सुरेश पिंगळे, हर्षल आहेर, प्रणीत सानप, पार्थ मानकर, सागर दाते, अतुल क्षीरसागर, तसेच संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# दिंडोरीत संघटनात्मक एकजुटीवर भर; अनेकांचा शिवसेनेत प्रवेश

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- मोहाडी येथील सह्याद्री फार्म येथे संसदरत्न खा. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसंवाद दौरा उत्साहात पार पडला. या दौऱ्यास उद्योगमंत्री उदय सामंत, शिक्षणमंत्री दादा भुसे, पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील, माजी खा. आनंद परांजपे यांच्यासह शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात विधानसभेचे माजी आमदार धनराज हरिभाऊ महाले यांची विधानसभा संपर्कप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली. पक्षाकडून १०० टक्के बूथ लेव्हल एजंट नियुक्ती पूर्ण झाल्याची माहिती त्यांनी दिली. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बांधणी, बूथ स्तरावरील तयारी आणि स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्धार यावर बैठकीत विशेष चर्चा झाली. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी धनराज महाले यांनी पक्षादेश मानत विधानसभेच्या निवडणुकीतून माघार घेतली. त्यांनी कोणताही गैरव्यवहार केला नसल्याची मला खात्री आहे. त्यामुळे त्यांच्यावर विनाकारण नाराजी व्यक्त करू नका. सर्वांनी एकत्र येऊन पुढील आमदार शिंदेसाहेबांच्या विचारांचा व्हावा यासाठी तयारीला लागा, असे स्पष्ट मत व्यक्त केले.

नाशिक संपर्कप्रमुख सुहास कांदे यांनी फायद्यासाठी सोबत येऊन नंतर साथ सोडणाऱ्यांना पुन्हा जवळ करू नका. आता हेवेदावे सोडून विषयावर बोला आणि श्रीकांत शिंदे यांचा वेळ वाया घालवू नका, असा टोला लगावत स्थानिक शिवसैनिक, शाखाप्रमुख आणि बूथप्रमुखांना विश्वासात घेतल्याशिवाय जिल्हा परिषद उमेदवारी दिली जाणार नसल्याचे स्पष्ट केले.

यावेळी सचिन देशमुख यांनी दिंडोरी शहरातील पाणीपुरवठा योजनेसाठी निधीची मागणी मांडली, तसेच सुरगाणा तालुक्यातील जलजीवन मिशनच्या कामांचा बोजवारा उडाल्याचा मुद्दाही शिवसैनिकांनी उपस्थित करण्यात आला.

कळवण व सुरगाणा तालुक्यातील शिवसैनिकांनी आरोग्य व शिक्षणाच्या प्रश्नांवर आवाज उठवत ग्रामीण भागातील समस्या मांडल्या. शिक्षणाच्या प्रश्नावर शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी तत्काळ निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले, तसेच आरोग्यविषयक प्रश्नांवर पुढील आठवड्यात आरोग्यमंत्री दिंडोरी दौरा करतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी आजी-माजी आमदार, जिल्हाप्रमुख, जिल्हा परिषद सदस्य, नगरसेवक, महिला आघाडी पदाधिकारी, युवासेनेचे कार्यकर्ते व ज्येष्ठ शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार जिल्हाप्रमुख भाऊलाल तांबडे यांनी मानले. कार्यक्रमात भाजपा व ठाकरे गटातील अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. किरण कावळे, राहुल गणोरे, दर्शन दायमा, पीयूष भवर, चेतन उफाडे, शशिकांत मातेरे, निखिल देशमुख, तुषार कड व चेतन जाधव यांच्यासह बोपेगाव, दहेगाव, वगळूद, वणी, लखमापूर, कृष्णगाव व ओझे परिसरातील कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश झाला.

# सिडकोत पर्यावरण व्याख्यानमाला

**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- अर्जुन प्रभात व श्रीगुरुजी शाखांच्या वतीने पर्यावरण व्याख्यानमालेचे ३ रे पुष्प नाशिक आकाशवाणीच्या निवेदिका यामिनी भाकरे यांनी गुंफले.

बडदे हॉल , जुने सिडको येथे सुरू असलेल्या पर्यावरण व्याख्यानमालेत प्रारंभी ज्येष्ठ समाजसेविका अलका गारसे यांनी प्रास्ताविक केले. दिनकर सोनवणे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. रमेश पाटील यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. नैसर्गिक शेतीद्वारे पर्यावरण संवर्धन या विषयावर भाकरे यांनी विचार मांडले. पर्यावरणाची महती सांगणाऱ्या गीताद्वारे त्यांनी व्याख्यानाचा श्रीगणेशा केला. प्राचीन काळातील नैसर्गिक शेती हे आपलं संचित आपण सोडले. वाढत्या लोकसंख्येनुसार अन्नधान्याची वाढती गरज लक्षात घेऊन रासायनिक शेती सुरू केल्याने नैसर्गिक पर्यावरण व आरोग्यविषयक पर्यावरणाचा ऱ्हास झाला असं त्या म्हणाल्या. सावळीराम तिदमे यांनी सूत्रसंचालन केले. अविनाश चव्हाण यांनी आभार मानले. तुळशीराम खैरनार, शांताराम पाटील, सोनवणे गुरुजी, सुधाकर शिरोडे, बाळकृष्ण वाडेकर, बाळासाहेब पवार, पंडित पाटील, प्रकाश काळे व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

# खरीप हंगामासाठी कृषी निविष्ठा तक्रारनिवारण कक्ष

**नाशिक (जिमाका वृत्तसेवा)** :- राज्यातील खरीप हंगाम सुरळीत व यशस्वी होण्यासाठी बियाणे, खते व कीटकनाशके यांचा पुरवठा वेळेत, गुणवत्तापूर्ण व मुबलक प्रमाणात उपलब्ध होणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर कृषी विभागामार्फत शेतकरी, वितरक व विक्रेते यांना भेडसावणाऱ्या विविध अडचणींचे तत्काळ निराकरण करण्यासाठी कृषी आयुक्तालय स्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे, अशी माहिती कृषी आयुक्तालय पुणेचे कृषी संचालक (निवगुनि) सुनील बोरकर यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यासाठी व्हॉट्सअॅप क्रमांक ९८२२४४६६५५ उपलब्ध करून देण्यात आला असून, कृषी विभागाचा टोल फ्री क्रमांक १८००२३४००० वरही संपर्क साधता येणार आहे. त्याचप्रमाणे controlroom.qc.maharashtra @gmail.com या ई-मेलवर तक्रारी व सूचना पाठविता येतील. बियाणे, खते व कीटकनाशकांच्या गुणवत्ता, किंमत, साठेबाजी, तसेच लिंकिंगच्या संदर्भातील तक्रारी नोंदविताना संबंधितांनी नाव, पत्ता, संपर्क क्रमांक व तक्रारीचा संक्षिप्त तपशील नमूद करावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. आवश्यक असल्यास तक्रारीचे लेखी स्वरूप अथवा छायाचित्र व्हॉट्सअॅपवर किंवा ई-मेलद्वारे पाठविण्याची सुविधाही उपलब्ध करण्यात आली आहे.

ज्या शेतकऱ्यांना व्हॉट्सअॅप वापरणे शक्य नाही, त्यांनी संपर्क क्रमांकासह तोंडी तक्रारी नोंदवाव्यात. शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी एक भ्रमणध्वनी, एक टोल फ्री क्रमांक व एक ई-मेल सेवा तक्रार निवारणासाठी सुरू करण्यात आली असून, सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत तक्रारी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नांदेड ते मुंबईदरम्यान दोन नवीन रेल्वे गाड्यांची सोय

**लासलगाव (भ्रमर वार्ताहर)** :- प्रवाशांच्या वाढत्या मागणीचा विचार करून रेल्वे प्रशासनाने हजूर साहिब (नांदेड) आणि लोकमान्य टिळक टर्मिनस (मुंबई) दरम्यान दोन नवीन साप्ताहिक एक्स्प्रेस गाड्या सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय दि. १९ मे रोजी उद्घाटनानिमित्त विशेष गाडीही सोडण्यात आली होती. या निर्णयामुळे मराठवाडा, विदर्भ आणि मुंबईदरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

गाडी क्रमांक ०७६६७ उद्घाटन विशेष गाडी १९ मे रोजी हजूर साहिब नांदेड येथून दुपारी ४ वाजता सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी ७.५० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल. तर परतीची ०७८१३ विशेष एकेरी गाडी दि. २० मे रोजी दुपारी १२ वाजता मुंबईहून सुटून रात्री ११.५० वाजता नांदेडला पोहोचेल.

यानंतर नियमित साप्ताहिक सेवाही सुरू होणार असून, गाडी क्रमांक १७६६७/१७६६८ ही एक्सप्रेस दर बुधवारी नांदेडहून आणि गुरुवारी मुंबईहून धावेल. तसेच गाडी क्रमांक १७६६५/१७६६६ ही सेवा सोमवार आणि मंगळवारी चालविण्यात येणार आहे. या गाड्यांना पूर्णा, वसमत, हिंगोली डेक्कन, वाशिम, अकोला, मलकापूर, भुसावळ, मनमाड, नाशिकरोड, इगतपुरी आणि कल्याण येथे थांबे देण्यात आले आहेत. काही गाड्यांना चाळीसगाव, नगरसूल, छत्रपती संभाजीनगर, जालना, परतूर आणि परभणी येथेही थांबा असेल.

गाड्यांमध्ये वातानुकूलित, शयनयान, सामान्य श्रेणी, तसेच पॅन्ट्रीकार आणि पॉवरकार डब्यांची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. गाडी क्रमांक १७६६६ आणि १७६६८ साठी आरक्षण १९ मे २०२६ पासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर, तसेच आयआरसीटीसी संकेतस्थळावर सुरू झाले आहे.

# नाशिकमध्ये प्रथमच ७ जून रोजी 'पेटाथॉन'

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- शहरात प्रथमच 'नाशिक पेटाथॉन २०२६' या अनोख्या पेट मॅरेथॉनचे रविवार दि. ७ जून रोजी आयोजन करण्यात आले असून सकाळी सहा वाजता फ्रावशी अॅकॅडमी त्र्यंबक रोड येथून या स्पर्धेला सुरुवात होईल.

यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत अधिक माहिती देताना आयोजकांनी सांगितले, की माणूस आणि पाळीव प्राणी एकत्र धावण्याचा अनुभव नागरिकांना मिळणार आहे. फिटनेस, लाईफस्टाईल, मनोरंजन आणि मानव-प्राणी नात्याचा उत्सव म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे. या उपक्रमाच्या अधिकृत लॉन्च कार्यक्रमाला नाशिकमधील मीडिया, फिटनेस, क्रीडा, लाईफस्टाईल आणि पेट कम्युनिटीतील मान्यवर उपस्थित होते. नागरिक, प्राणीप्रेमी, कुटुंबीय आणि विविध ब्रँड्सना एकत्र आणणारा हा शहरातील पहिलाच मोठा पेट-कम्युनिटी कार्यक्रम ठरणार आहे. हा उपक्रम फ्रावशी ग्रुप ऑफ स्कूल्स यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येत असून पेटाथॉनमध्ये पाळीव प्राण्यांसाठी विशेष १ किमी 'पेट रन' आयोजित करण्यात येणार आहे. याशिवाय नागरिकांसाठी ३ किमी, ५ किमी आणि १० किमी अशा विविध मानवी मॅरेथॉन स्पर्धाही असतील. सर्व स्पर्धा प्रोफेशनल टाइमिंग सिस्टीमसह पार पडणार आहेत.

आयोजक प्रथमेश पाटकर आणि त्यांच्या टीमने सांगितले, की 'नाशिक पेटाथॉन' हा केवळ क्रीडा उपक्रम नसून पाळीव प्राण्यांबाबत जागरुकता, जबाबदार पेट पॅरेंटिंग, आरोग्यदायी जीवनशैली आणि सामाजिक सहभाग वाढविण्याचा प्रयत्न आहे. मॅरेथॉनचा मार्ग नाशिकमधील प्रमुख रस्त्यांवरून असणार असून, सहभागी आणि पाळीव प्राण्यांसाठी सुरक्षित व उत्साहपूर्ण वातावरण तयार करण्यात येणार आहे. www.nashikpethathon.in वर नोंदणी करता येईल, असे आयोजकांनी सांगितले.

याप्रसंगी रतन लथ, शर्वरी लथ, प्रथमेश पाटकर, डॉ. पोपट काळे, सचिन वेंदे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रणजित जोशी, डॉ. चेतना दहिवेलकर, डॉ. आश्लेषा पवार आदी उपस्थित होते.

> ### विविध आकर्षणांनी सजलेला उत्सव
>
> कार्यक्रमात पाळीव प्राण्यांसाठी विशेष डॉग प्ले एरिना उभारण्यात येणार असून त्यात टनेल्स, मिनी हर्डल्स, रॅम्प्स, बॉल पिट्स, स्प्लॅश पूल आणि अॅजिलिटी गेम्सचा समावेश असेल, तसेच नागरिकांसाठी पिकल बॉल, कॅलिस्थेनिक्स, एमएमए, रिदमिक जिम्नॅस्टिक्स, ग्रुप फिटनेस सेशन्स यासारख्या उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. पेट, फिटनेस, फॅशन आणि वेलनेस क्षेत्रातील विविध ब्रँड्सचे स्टॉल्सही कार्यक्रमात असणार आहेत. सहभागींना एक हजार रुपयांहून अधिक किमतीच्या वस्तूंचा समावेश असलेले प्रीमियम पार्टिसिपेशन किट आणि गिव्हअवे दिले जाणार आहेत.




# सिन्नर पोलिसांची धडक कारवाई; १.८७ कोटींचा गुटखा जप्त

**सिन्नर (भ्रमर प्रतिनिधी)** :- महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या गुटखा व पानमसाल्याच्या अवैध वाहतुकीवर सिन्नर पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल १ कोटी ८७ लाख ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. बारागाव पिंप्री रोडवरील सांगळे फार्म हाऊस परिसरात ही कारवाई करण्यात आली.

दोन मालवाहू ट्रकमधून मोठ्या प्रमाणात गुटखा, जर्दा व पानमसाल्याची वाहतूक केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर सापळा रचण्यात आला होता.

सिन्नर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमंतकुमार भामरे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाल्यानंतर तातडीने विशेष पथक तयार करण्यात आले. पथकाने बारागाव पिंप्री रोडवर नाकाबंदी केली असता निफाडकडून येणारा (एमएच ४० वाय १९७९) क्रमांकाचा टाटा कंटेनर आणि (एमएच ४० सीएम ६६१६) क्रमांकाचा अशोक लेलॅण्ड ट्रक संशयास्पदरीत्या आढळून आला. पोलिसांनी दोन्ही वाहने ताब्यात घेतली; मात्र यावेळी एका वाहनाचा चालक घटनास्थळावरून पसार झाला.

टाटा कंटेनरवरील चालकाने आपले नाव रब्बी अहमद शेख (रा. मंगरुळपीर, जि. वाशिम) असे सांगितले. पोलिसांनी दोन्ही वाहने सिन्नर पोलीस ठाण्यात आणून पंचांसमक्ष तपासणी केली असता प्रतिबंधित सुगंधित पानमसाला, जर्दा व गुटखासदृश माल आढळून आला. त्यानंतर अन्न व औषध प्रशासन विभागाला माहिती देण्यात आली.

अन्न सुरक्षा अधिकारी संदीप तोरणे, अक्षय गाडेकर व चेतन परदेशी यांनी पंचांसमक्ष तपासणी केली असता ६६ लाख रुपयांचा 'बाजीराव बीआर गोल्ड' फ्लेवर पानमसाला, ७६ लाख ५६ हजार रुपयांचा 'नजर' पानमसाला व जर्दा, तसेच ९ लाख ९० हजार रुपयांचा 'मस्तानी २१६ प्रीमियम च्युइंग टोबॅको' असा साठा आढळून आला, त्याचबरोबर २० लाख रुपयांचा टाटा कंटेनर आणि १५ लाख रुपयांचा अशोक लेलॅण्ड ट्रक असा एकूण १ कोटी ८७ लाख ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी सिन्नर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १२३, २२३, २७४, २७५, तसेच अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी रब्बी अहमद शेख याला अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.



ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी, अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी कांतीलाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हेमंतकुमार भामरे, पोउनि अंकुश वारुंगसे, हवालदार समाधान बोराडे, नितीन डावखर, गणेश वराडे, गवंडी, तसेच पोलीस अंमलदार विनोद टिळे, कृष्णा कोकाटे, प्रशांत सहाणे, आप्पासाहेब काकड, विलास बिडगर, महेंद्र खामकर आणि तवर यांच्या पथकाने केली. पुढील तपास पोलीस निरीक्षक हेमंतकुमार भामरे करीत आहेत.

# जिल्हा मास्टर्स अजिंक्यपद स्पर्धा उमेश कुंभोजकर यांना दुहेरी मुकुट




**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- नासिक जिल्हा टेबलटेनिस असोसिएशनच्या वतीने नासिक जिल्हा मास्टर्स टेबलटेनिस अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ४०, ५०, ६० वर्षांवरील पुरुष एकेरी, महिला एकेरी व दुहेरीच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धेत एकूण ६० पेक्षा जास्त प्रवेशिका आल्या. या स्पर्धा लीग पद्धतीने खेळविण्यात आल्या.

५० वर्षांवरील पुरुषांच्या एकेरीत उमेश कुंभोजकर यांनी अंतिम सामन्यात ऑगस्टीन डिमेलो यांचा ४-११, ११-३, ११-४ असा २-१ ने पराभव करून विजेतेपद पटकावले, तर ६० वर्षांवरील पुरुषांच्या एकेरीत कुंभोजकर यांनी अंतिम सामन्यात शिवानंद कुंडाजे यांचा ११-३, ११-७ असा २-० ने पराभव करून दुसरे विजेतेपद आपल्या नावे करीत दुहेरी मुकुट मिळवण्याचा मान मिळविला. ४० वर्षांवरील पुरुष एकेरीत अंतिम सामन्यात ऑगस्टीन डिमेलो यांनी अंतिम फेरीत सागर कुलकर्णी यांचा ११-४, ११-८ असा २-० ने पराभव करून विजेतेपद.

४० वर्षांवरील महिलांच्या एकेरीत सौ. स्वाती आघारकर यांनी अंतिम फेरीत सौ. सुनीता धटिंगण यांचा ११-४, ११-९ असा २-० ने पराभव करून विजेतेपद आपल्या नावे केले.

पुरुष दुहेरीत सुरेश शर्मा आणि सुनील माळोदे यांच्या साथीने अंतिम फेरीत ऑगस्टीन डिमेलो व एन. वासुदेव या जोडीचा ११-६, ६-११, ११-५, ८-११, ११-६ असा ३-२ ने पराभव करून विजेतेपद पटकावले.

या स्पर्धेतील विजेते व उपविजेते खेळाडूंना नासिक जिल्हा टेबलटेनिस संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र छाजेड यांच्या हस्ते रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. तसेच या प्रसंगी पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या ३२ व्या मास्टर्स राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेत ७० वर्षांवरील पुरुषांच्या गटात तीन सुवर्णपदके पटकावण्याऱ्या शिवानंद कुंडाजे यांच्यासह विविध गटांत पदके मिळविणाऱ्या उमेश कुंभोजकर, सतीश शिरसाट, स्वाती आघारकर, ज्योती कुलकर्णी व सुनीता धटिंगण यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन असोसिएशनचे सचिव शेखर भंडारी यांनी केले. या प्रसंगी राजेश भरवीरकर, मिलिंद कचोळे, अभिषेक छाजेड, सुहास आघारकर आदी मान्यवर, खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पुरुषोत्तम आहेर, स्वाती आघारकर व अभिषेक छाजेड यांनी विशेष परिश्रम घेतले.

# समीक्षा मुंदडाने डिझाईन केली राजस्थान रॉयल्स संघाची जर्सी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- इंडियन प्रीमिअर लीगच्या राजस्थान रॉयल्स संघाविषयी नाशिककरांसाठी अभिमानास्पद बाब म्हणजे दि. ९ मे रोजी झालेल्या राजस्थान रॉयल्स विरुद्ध गुजरात टायटन्सच्या सामन्यातील खास गुलाबी जर्सी ही नाशिकच्या १९ वर्षीय समीक्षा रामेश्वर मुंदडाने डिझाईन केली आहे.



राजस्थान रॉयल्सच्या 'HunaRR Manch contest' स्पर्धेत आलेल्या ८५०० हून अधिक प्रवेशिकांमधून १९ वर्षीय समीक्षा रामेश्वर मुंदडाने डिझाईन केलेली जर्सी निवडली गेली. संपूर्ण राजस्थान रॉयल्स संघ या खास गुलाबी जर्सीमध्ये मैदानात उतरला. हा सामना रॉयल्सच्या तिसऱ्या वर्षाच्या 'Pink Promise Match' चे प्रतीक होता.

राजस्थान रॉयल्स फाऊंडेशनच्या माध्यमातून राजस्थानमध्ये महिलांच्या नेतृत्वाखालील परिवर्तनाला पाठिंबा देण्यासाठी हा उपक्रम राबसूला जातो.

या उपक्रमात सामाजिक बांधिलकीदेखील सामील आहे. सामन्यादरम्यान मारल्या गेलेल्या प्रत्येक षटकारामागे राजस्थानमधील सांबर या ऐतिहासिक शहरातील सहा घरांमध्ये सौरऊर्जेचा वापर करून विद्युतीकरण करण्यात येणार आहे.

कॉम्प्युटर इंजिनिरिंगची विद्यार्थिनी असलेल्या समीक्षाला लहानपणापासून डिझाईन करण्यात रस आहे. क्रिकेट आणि पोस्टर्स बनविण्याची आवड असलेल्या समीक्षाच्या पहिल्याच जर्सी डिझाईनला हे जोरदार यश मिळाले. ही या खास गुलाबी जर्सी मागील प्रेरणादायी कहाणी आहे.

नामांकित क्रिकेटपटू यशस्वी जैस्वाल, वैभव सूर्यवंशी, रवींद्र जडेजा व रियान पराग यांच्या राजस्थान रॉयल्स संघाशी या पद्धतीने जोडली गेल्याबद्दल समीक्षा खूप आनंदित आहे.

तिच्या इच्छेनुसार तिला ही गुलाबी – पिंक प्रॉमिस – जर्सी रवींद्र जडेजाला देण्याचे भाग्य मिळाले, ही तिच्यासाठी अतिशय अविश्वसनीय अशी घटना होती. नाशिककर समीक्षाच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

नाशिकला आयपीएलमधील आणखी एक मानाचा क्षण त्यानिमित्ताने मिळाला. आधी रामकृष्ण घोष चेन्नई संघाकडून, साहिल पारख दिल्ली संघाकडून खेळला. तर सोहम् शहाणे जिओ हॉटस्टारवर आयपीएल सामान्यांचे समालोचक झाला आणि आता समीक्षा मुंदडाने राजस्थान रॉयल्स संघाची जर्सी डिझाईन करण्याचा मान मिळविला.


## जाहीर नोटीस

मी खालील सही करणार आज दि. २०/५/२०२६ रोजी जाहीर करते की, माझे पती **शांताराम विश्राम पिंगळे** यांचा मृत्यू दि. २/८/२०२५ रोजी झाल्याने त्यांच्या नावावर असलेली स्विफ्ट डिझायर मारुती सुझुकी गाडी क्रमांक **MH 15 EP 5345** माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी मी **श्रीमती जयश्री शांताराम पिंगळे** रा. फ्लॅट नंबर ८, पटेल आर्केड, लोकसहकारनगर, दिंडोरी रोड, नाशिक वारस हक्कदार (पत्नी) म्हणून मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे अर्ज करीत आहे. सदर स्विफ्ट डिझायर मारुती सुझुकी गाडी माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी कोणाची हरकत असल्यास सात दिवसांच्या आत समक्ष भेटून कळवावे किंवा मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे लेखी संपर्क साधावा. सात दिवसांनंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. कळावे.

सही/-

**श्रीमती जयश्री शांताराम पिंगळे**

# निरीक्षण गृहास रोटरीतर्फे १.५१ लाखाचे साहित्य प्रदान



रोटरी क्लबच्या वतीने रोटेरियन शेखर ब्राह्मणकर यांच्या इलेक्ट्रो क्रिंप कॉन्टॅक्ट प्रायव्हेट लिमिटेड (नाशिक) या कंपनीच्या सीएसआर निधीमधून निरीक्षण गृहास गाद्या व पलंग असे १.५१ लाखाचे साहित्य देणगी दाखल देण्यात आले. याप्रसंगी बोलताना रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. गौरव सामनेरकर. समवेत सहाय्यक प्रांतपाल मुरली राघवन, माजी अध्यक्ष आणि रोटरी ट्रस्टचे ट्रस्टी अनिल सुकेणकर, माजी अध्यक्ष ओमप्रकाश रावत, निरीक्षण व बालगृहाचे मानद सचिव चंदुलाल शाह, सीए प्रफुल्ल बरडीया, शिल्पा पारख, सुहास कुलकर्णी, भारत बिरारी, लीना बाकरे, धनपत अग्रवाल, मकरंद चिंधडे व माधवी सुकेणकर.

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** रोटरी क्लब ऑफ नाशिक गेल्या ८२ वर्षांपासून नाशिकमध्ये समाजोपयोगी कार्य करीत आहे. याअंतर्गत निरीक्षण गृह आणि बालगृहास रोटेरियन शेखर ब्राह्मणकर यांच्या इलेक्ट्रो क्रिंप कॉन्टॅक्ट प्रायव्हेट लिमिटेड (नाशिक) या कंपनीच्या सीएसआर निधीमधून १० बेड, १० गाद्या, उशा, चादरी, उशा कव्हर असे सुमारे १ लाख ५१ हजार रुपये किमतीचे साहित्य नुकतेच प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमात मानद सचिव चंदुलाल शाह यांनी संस्थेच्या कार्याविषयी माहिती दिली व रोटरीने केलेल्या सहाय्यासाठी कृतज्ञता व्यक्त केली. रोटरी क्लब ऑफ नाशिकचे अध्यक्ष डॉ. गौरव सामनेरकर यांनी रोटरी क्लब करीत असलेल्या कार्याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व देणगीदार शेखर ब्राह्मणकर यांनी पुढील कामासाठीदेखील देणगी जाहीर केली. प्रकल्प सचिव आर्किटेक्ट मकरंद चिंधडे यांनी आभार व्यक्त केले. याप्रसंगी सहाय्यक प्रांतपाल मुरली राघवन, माजी अध्यक्ष आणि रोटरी ट्रस्टचे ट्रस्टी अनिल सुकेणकर, माजी अध्यक्ष ओमप्रकाश रावत, सीए प्रफुल्ल बरडीया, शिल्पा पारख, सुहास कुलकर्णी, भारत बिरारी, लीना बाकरे, धनपत अग्रवाल व माधवी सुकेणकर उपस्थित होते.

# द्वारका–नाशिकरोड रस्ता रुंदीकरण कामाला ब्रेक

## आचारसंहितेचा अडसर : निविदा प्रक्रिया लांबणार

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–**नाशिक–पुणे राष्ट्रीय महामार्गावरील द्वारका–नाशिकरोड (दत्त मंदिर) रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम महिना अखेर सुरु करण्याच्या प्रशासनाच्या तयारीला ब्रेक लागला असून, विधानपरिषदेची आचारसंहिता जारी झाल्याने या कामासाठी मागविलेल्या निविदा प्रकीया लांबणार आहे.


दरम्यान, २२० कोटी रूपये खर्च करून रूंदीकरण होणाऱ्या या रस्त्याच्या कामा संदर्भात निविदेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या ठेकेदारांची प्री–बीड बैठक मंगळवारी घेण्यात आली असता, त्यात दहा ठेकेदार कंपन्यांनी सहभागी होण्याची तयारी दर्शविली आहे. शहरातील वाहतुकीचा मुख्य कणा असलेल्या द्वारका सर्कल ते दत्त मंदिर, नाशिकरोड या ६.४ किमी महामार्ग रस्ता रूंदीकरण प्रकल्पाला अखेर केंद्र सरकारची अंतिम मंजुरी मिळाली आहे. सुमारे २२० कोटी रुपये खर्चाच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम याच महिन्याच्या अखेरीस प्रत्यक्ष सुरु करण्याचा मनपाचा इरादा असून, यामुळे द्वारका परिसरातील वषार्नुवर्षांची वाहतूक कोंडी फुटण्यास मोठी मदत होणार आहे. हा प्रकल्प प्रशासकीय मंजुरीअभावी गेल्या काही काळापासून रखडला होता. जरी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने यापूर्वी तत्त्वत: मान्यता दिली होती, तरी प्रत्यक्ष कामाचे आदेश मिळण्यास विलंब होत होता. गेल्या ८ मे रोजी दिल्लीत वाहतूक व दळणवळण मंत्रालयात पार पडलेल्या उच्चस्तरीय बैठकीत या कामावर शिक्कामोर्तब करण्यात आले. २०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी, म्हणजेच मार्च २०२७ पर्यंत हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पामुळे नाशिकरोड ते द्वारका हा प्रवास अधिक वेगवान आणि सुखकर होणार असून, शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला एक नवी दिशा मिळेल.

दरम्यान काल ठेकेदारांची प्री–बीड बैठक कार्यकारी अभियंता रविंद्र बागूल यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. त्यात दहा विविध कंपन्यांनी या रस्त्याच्या कामात रस दाखविला. तथापि, सध्या सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे डांबर मिळणे कठीण होवून दरवाढ होऊ लागली आहे. त्यामुळे दरवाढीचा मुद्दा निविदेत लक्षात घेण्याची बाब ठेकेदारांनी बोलून दाखविली आहे. येत्या २७ मे अखेर निविदा सादर करण्याची अंतीम मुदत आहे. त्यानंतर लगेचच काम सुरू करण्याचे नियोजन मनपा प्रशासनाने केले होते. तथापि, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीच्या आचारसंहितेचा अडसर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. द्वारका सर्कल ते दत्त मंदिर या मार्गाच्या रुंदीकरणासाठी महापालिकेने १७ मार्च रोजी निविदाप्रक्रिया सुरू केली होती. सुरुवातीला ११ एप्रिल ही अंतिम मुदत होती; मात्र कंत्राटदारांकडून प्रतिसाद न मिळाल्याने २७ एप्रिलपर्यंत मुदत वाढविण्यात आली. त्यानंतर फेरनिविदा प्रक्रिया राबविण्यात आली. या प्रकल्पात मुख्य रस्ता हा सहा लेनचा असेल. दोन्ही बाजूला साडेसात मीटर रूंदीचे दोन सर्व्हिस रोड असणार आहे.

## आजचे वाढदिवस



**रमेश देशमुख**
अध्यक्ष, ज्येष्ठ नागरिक संघ



**डॉ. हितेंद्र महाजन**
सायकलिस्ट



**हर्षदा गायकर**
नगरसेविका

# तेल कंपन्यांच्या प्रतिनिधींसोबत आज महत्त्वाची बैठक

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** चार दिवसांत दुसऱ्यांदा पेट्रोल–डिझेल प्रतिलिटर १ रुपयाने महागले असून पेट्रोल १०८ रुपये तर डिझेल ९५.३५ रुपये प्रतिलिटर झाले आहे.

उद्या इंधनाची कमतरता जाणवू शकेल अशी नागरिकांमध्ये भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे काही पंपावर पेट्रोल नसल्याचे सांगितले जात आहेत, तर काही पेट्रोल पंपावर वाहनांची मोठी गर्दी होत आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात तेल कंपन्यांच्या प्रतिनिधींची तातडीची बैठक बोलाविली आहे.

या बैठकीत इंधन उपलब्धतेचा आढावा घेतला जाणार असून ग्रामीण भागात डिझेल टंचाईची स्थिती निर्माण झाली आहे. मनमाड येथील पानेवाडीमधील डेपोत मुबलक इंधनसाठा उपलब्ध असतानाही डिझेल मिळत नसल्याच्या तक्रारी येत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन सतर्क झाले असून तातडीने तेल कंपन्यांच्या प्रतिनिधींची बैठक बोलविली आहे.

> जिल्ह्यात पेट्रोल, डिझेलचा पुरवठा सुरळीत सुरु आहे. काही पंपांवर पेट्रोल, डिझेल मिळत नाही, अशा तक्रारी प्राप्त झाल्या, या पंपाची चौकशी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. घाबरण्याचे कारण नाही. इंधनसाठा मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता पेट्रोल, डिझेल भरण्यासाठी गर्दी करू नये.
>
> – रमेश गायकवाड, जिल्हा पुरवठा अधिकारी, नाशिक.

दरम्यान, शहरासह त्र्यंबकेश्वरातील काही भागात पेट्रोल पंपांवर पेट्रोल व डिझेल भरण्यासाठी वाहनांच्या रांगा लागल्या तर काही ठिकाणी पेट्रोल, डिझेल शिल्लक नसल्याचे बोर्ड लागले होते. त्यामुळे या पंपांची चौकशी करा, अशी सूचना पुरवठा विभागाने संबधीत तेल कंपन्यांना केली आहे. त्यानुसार आज होणाऱ्या बैठकीत तेल कंपन्यांच्या प्रतिनिधींना अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

# एम. एड. प्रवेश पात्रता परीक्षेत प्रतीक्षा श्रीवास्तव प्रथम



**निफाड (भ्रमर वार्ताहर) :–** नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र राज्य एम. एड. प्रवेश पात्रता परीक्षेत लासलगाव येथील प्रतीक्षा श्रीवास्तव यांनी ९९.६३ टक्के इतके विक्रमी पर्सेंटाइल गुण मिळवीत दैदिप्यमान यश संपादन केले आहे.

विशेष म्हणजे आपल्या जेमतेम सव्वा महिन्याच्या बाळाला आजी आजोबांच्या हाती सोपवून परीक्षा देण्याचे अग्निदिव्य करून त्यांनी हे यश मिळविले. याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. यापूर्वी बी. एड. प्रवेश पात्रता परीक्षेतही राज्यात प्रथम येण्याचा बहुमान प्रतीक्षा श्रीवास्तव यांनी मिळविला आहे.

# एकाच वेळी आठ जण लाच स्वीकारताना ताब्यात

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)–** सागाचे झाड तोडून त्याची विक्री करण्याची परवानगी देण्याच्या मोबदल्यात ११,५०० रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने काल एकाच वेळी तब्बल ८ जणांना रंगेहाथ पकडले. यामध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयातील ६ लोकसेवक आणि २ खासगी इसमांचा समावेश आहे.

या धडक कारवाईमुळे नाशिक जिल्ह्यातील वनविभागात आणि शासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. दहेगाव पाटोदा येथील एका शेतकऱ्याने त्यांच्या शेत गट क्र. ६१ मधील सागाची झाडे तोडण्यासाठी वनविभागाकडे परवानगी मागितली होती. परवानगी मिळवून देण्यासाठी आरोपींनी १९ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती ११,५०० रुपये स्वीकारण्याचे ठरले. १६ मे रोजी एसीबीने केलेल्या पडताळणीत लाचेची मागणी केल्याचे सिद्ध झाले होते. त्यानुसार काल एसीबीच्या पथकाने येवला शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापळा रचला.

मुख्य आरोपी वनपाल भाऊसाहेब माळी याच्यासाठी वनरक्षक पंकज नागपुरे याने ५,००० रुपये स्वीकारले. तसेच उर्वरित आरोपी कनिष्ठ लिपिक प्रवीण भोसले, वनरक्षक आकाश कोळी, वनमजूर विजय लोंढे, रामनाथ भोरकडे आणि खासगी डेटा ऑपरेटर निखिल आरणे व खासगी चालक सुनील भुरुक यांनीही लाचेचा हिस्सा स्वत:साठी स्वीकारला. पैसे स्वीकारतानाच एसीबीने या सर्वांना रंगेहात ताब्यात घेतले.

# ओमसाई वेल्फेअर असोसिएशनतर्फे मातृदिन साजरा



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :** –ओमसाई वेल्फेअर असोसिएशन फॉर द ब्लाइंड अँड डिझॅबल्ड या संस्थेच्या वतीने जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून मविप्रच्या समाजकार्य महाविद्यालयातील सभागृहात अंध महिलांकरिता आरोग्य तपासणी शिबिर व विविध गुणदर्शन, तसेच कर्तृत्ववान मातांना आदर्श माता पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून स्वप्नील गांगुर्डे, रविंद्र गांगुर्डे, रेखा जाधव उपस्थित होते. प्रारंभी लुई ब्रेल व डॉ. हेलन केलर यांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर प्रास्ताविक व संस्थेचा परिचय करून देण्यात आला. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांनी मनोगते व्यक्त केली. या प्रसंगी बोलताना स्वप्नील गांगुर्डे यांनी आपण संस्थेचे कार्य पाहून प्रभावित झालो असून सदैव संस्थेबरोबर राहू, असे सांगितले. रवींद्र गांगुर्डे यांनी संस्थेने केलेल्या मागणीनुसार संस्थेला शासकीय इमारत अथवा भूखंड महापालिकेच्या माध्यमातून उपलब्ध करून देऊ व गरजू अंध व्यक्तींकरिता औद्योगिक वसाहतीत नोकऱ्या मिळून देण्याकरिता प्रयत्न करू. तर रेखा जाधव यांनी ब्युटीशियन या नात्याने उपस्थित महिलांना सौंदर्याच्या टिप्स दिल्या व संस्थेच्या कार्याचे कौतुक करून आपण जमेल तेव्हढे संस्थेस मदत करू असे सांगितले. त्यानंतर प्रमुख अतिथींच्या हस्ते अनुक्रमे सुनीता शिवदे, मंगल इंगळे, कल्पना खैरे, दीपा पारेवाल, पल्लवी मरकड यांना आदर्श माता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यानंतर संस्थेचे मानद अध्यक्ष डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी यांनी उपस्थितांचे आभार मानले. संस्थेचे अध्यक्ष विकास शेजवळ यांनी संस्थेचा परिचय करून दिला. महासचिव रामदास जगताप यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. उपस्थित सर्व महिलांना आकर्षक गृहोपयोगी भेटवस्तू देऊन स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता साईबाबा हार्ट इन्स्टिट्यूटचे डॉक्टर्स व त्यांची टीम, निशिकांत मोगल, गिरीश पवार यांनी सहकार्य केले. ओमसाई संस्थेचे पदाधिकारी शेखरभाई शाह, निमिता शेजवळ आदींनी परिश्रम घेतले.

## विनयभंगाची केस मागे ...

**(पान १ वरून)** :– जण वडनेर रोडवरील साईबाबा मंदिरात दर्शनासाठी गेले. त्यावेळी तेथे विनायक म्हैसधुणे भेटला असता त्याला विनयभंगाची तक्रार मागे घेण्यासाठी सांगितले. त्यावर म्हैसधुणे याने माझी पोलीस ठाण्यामध्ये खूप ओळख आहे. तु जर मला आत्ता १० हजार रुपये दिले नाही तर तुला अटक करायला सांगेल, अशी धमकी देऊन १० हजारांची खंडणी मागितली. फिर्यादीच्या पत्नीने पतीला अटक होईल, या भीतीपोटी आई–वडिलांकडून ६ हजार रुपये घेऊन ते म्हैसधुणेला दिले. त्यानंतर म्हैसधुणे याने बहिणीच्या नादाला लागला तर याद राख अशी धमकी दिली. त्यानंतर पुन्हा संध्याकाळी ७ वाजता फिर्यादीची पत्नी, सासू व फिर्यादी म्हैसधुणे याला भेटायला गेले. त्याने विनयभंगाची केस मिटवण्यासाठी फिर्यादीकडे पुन्हा २५ हजार रुपयांची खंडणी मागितली. त्यावेळी फिर्यादीने इतके पैसे माझ्याकडे नाहीत, असे सांगून त्याला विनवनी केली. मात्र म्हैसधुणे याने फिर्यादीच्या पत्नीकडे पाहून 'तुझी बायको दिसायला चांगली आहे, तिला बाजारात विक आणि मला पैसे आणून दे,' असे म्हणून पत्नीकडे पाहून अश्लिल हातवारे करुन स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य केले व शिवीगाळ करून आम्हाला घरातून हाकलून दिले. या प्रकरणी देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात विनायक म्हैसधुणेविरुद्ध खंडणीसह विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहे.

## विधान परिषद निवडणूक.....

**(पान १ वरून)** इतिहास रचत ३७ मतांनी विजय मिळविला होता. पिंगळे खासदार झाल्यानंतर डॉ. वसंत पवार निवडून आले, त्यांनी सलग दोनदा विजय मिळविला. डॉ. पवार यांच्या निधनानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे जयवंत जाधव विजयी झाले. दीड वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसने जाधव यांनाच उमेदवारी दिली. शिवसेनेचे ॲड. शिवाजी सहाणे यांच्याविरुद्ध झालेल्या लढतीत दोघांना समान मते मिळाल्याने लॉटरी पद्धतीने निवड करण्यात आली. त्यात जयवंत जाधव विजयी घोषित झाले. जाधव यांच्या विजयाला सहाणे यांनी न्यायालयात आव्हान दिले. त्यानंतर २०१८ मध्ये भाजप–शिवसेना युतीचे नरेंद्र दराडे विजयी झाले. त्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसकडून शिवाजी सहाणे यांनी निवडणूक लढवली होती, मात्र त्यांचा पराभव झाला. २०२४ मध्ये या जागेची मुदत संपली होती. मात्र महापालिका आणि जिल्हा परिषद सदस्य हे मतदार असल्याने, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न झाल्याने ही निवडणूक घेण्यात आली नव्हती. आता या विधान परिषद निवडणुकीचे बिगुल वाजले असून इच्छुकांच्या हालचाली वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर माजी खासदार देवीदास पिंगळे यांची उमेदवारी चर्चेचा विषय ठरणार आहे.

# 'अधिक मासात समस्याही' अधिक शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत

**त्र्यंबकेश्वर (भ्रमर वार्ताहर):–** प्रत्येक तीन वर्षांनी येणारा अधिकमास अर्थात पुरूषोत्तममासाचा पर्वकाल सुरू झाला आहे. आद्य ज्योतिर्लिंग त्र्यंबकेश्वर मंदिर, दक्षिण गंगा गोदावरी उगमस्थान, संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज संजीवन समाधी मंदिर असलेल्या त्र्यंबक नगरीत दरवर्षाला येणारा श्रावण महिना व तीन वर्षांनी येणारा अधिकमास यांचा पर्वकाल साधण्यासाठी भक्तांची गर्दी उसळते. सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन करण्यासाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या प्रशासनाला याचा नेमका विसर पडला आहे. त्यामुळे त्र्यंबकवासीयांना आणि येथे येणाऱ्या देशभरातील भक्तांना पुण्य फलदायी असलेला धोंड्याचा महिना दुष्काळात तेरावा भासल्यास नवल वाटायला नको!

त्र्यंबकेश्वर शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. दोन दिवसातुन जेमतेम अर्धा तास कमी दाबाने एकदा मिळणारे नळाचे पाणी ठरलेल्या वेळेतच मिळेल याचा भरवसा राहिलेला नाही. वीज पुरवठा खंडीत झाला, जलवाहीनी फुटली यासारख्या कारणांनी दोन दिवसातून एकदा मिळणारे पाणी देखील ठरावीक वेळेत मिळत नसल्याने नागरिकांच्या समस्या वाढल्या आहेत. नगर परिषद पाणीपुरवठा विभाग जमेल तसे दुपारी तिसऱ्या प्रहरी पाणीपुरवठा करत असते . नागरिकांनी दिवसभर नळाजवळ बसून पाण्याची प्रतिक्षा करावी राहावे अशी वस्तुस्थिती निर्माण झाली आहे.

वीज पुरवठा खंडीत होण्याच्या कारणास्तव नगर परिषदेच्या पाणी पुरवठा विस्कळीत झालेला आहे. नगर परिषदेने ६६ कोटी रूपयांची वाढीव पाणीपुरवठा योजनेचे काम हाती घेतले आहे. भविष्यात पाणी टंचाई भेडसवणार नाही, असा दावा प्रशासन करत आहे. तथापि सध्या सुरू असलेल्या वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाचा दर्जा पाहता पुढच्या काही वर्षात त्र्यंबक शहरात पाणीप्रश्न आणखी गंभीर स्वरूप धारण करणार आहे असे दिसते.

## रहदारीची जागोजागी होते कोंडी

अत्यंत सुमार दार्जाचे आणि भौगोलीक परिस्थिती लक्षात न घेता पाईपलाईन टाकण्यात येत आहे. रस्ते कामात तुटलेला नळ प्लास्टिक पाईपने जोडले जातात. उन्हाळ्याचा अखेरचा टप्पा सुरू झालेला व अवकाळी पावसाचे दिवस जवळ आलेले असतांना पिण्याच्या पाण्याचा निर्माण झालेला तुटवडा, त्यात खोदून ठेवलेले रस्ते, सिंहस्थ नियोजनात उशीरा हाती घेतलेले कॉरिडॉरचे काम आणि त्यासाठी सुरू असलेली तोडफोड या सर्वांचा एकत्रीत परिणाम जनजीवन त्रस्त झालेले पहावयास मिळत आहे. तशात प्रवासी वाहनांची बेशिस्त पार्किंग, नागरिकांच्या वाहनांनी जागोजागी आडवलेले रस्ते आणि गल्लीबोळ यामुळे रहदारीची वारंवार होणारी कोंडी स्थानिक आणि बाहेरचे भाविक यांच्यामध्ये नाराजी निर्माण करत आहे. शहरात सध्या काही रस्ते खोदलेले आणि न खोदलेल्या रस्त्यांवर वाहने उभी असतात. त्यामुळे शहराची दळणवळण व्यवस्था पूर्णतः कोलमडली आहे.

त्र्यंबकेश्वर येथे अधिकमासाच्या निमित्ताने हरिनाम सप्ताह, भागवत सप्ताह, शिवमहापुराण कथा अशा विविध धार्मिक कार्यकमांचे आयोजन होत आहे. येथे निवासी आलेले भक्त लक्षणीय संख्येने दिसून येतात. त्यांना मुलभुत सुविधा उपलब्ध करून देणे प्रशासनाची जबाबदारी आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन करण्यासाठी बैठकांचा उच्चांक करणारी प्रशासन यंत्रणा तीन वर्षांनी एकादा येणाऱ्या अधिकमासाच्या मेळ्याबाबत गाफील राहीली आहे. कोणत्याही पूर्व नियोजना विना तीर्थक्षेत्र त्र्यंबकेश्वर धोंड्याच्या महिन्याचा पर्वकालाला सामोरे जात आहे.

# प्रभाग २१ मधील विकासकामांसाठी मनपा आयुक्तांना निवेदन



**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी) :–** मनपाच्या आयुक्त मनीषा खत्री यांना प्रभाग क्रमांक २१ मधील विविध प्रलंबित विकासकामे व नागरी समस्यांबाबत सविस्तर निवेदन देण्यात आले. परिसरातील मूलभूत सुविधांच्या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी यावेळी नगरसेविका श्वेता भंडारी यांनी केली.

या निवेदनामध्ये प्रभागातील अनेक रस्त्यांची दुरवस्था, पिण्याच्या पाण्याचा अपुरा पुरवठा, उघड्या गटारींमुळे निर्माण होणारी अस्वच्छता, तसेच नागरिकांच्या आरोग्यावर होणारे परिणाम यांचा उल्लेख करण्यात आला. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गटारींची स्वच्छता व दुरूस्ती तातडीने करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे बिटको रुग्णालय येथील आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा करून नागरिकांना अधिक चांगल्या सेवा उपलब्ध करून द्याव्यात, असेही निवेदनात नमूद करण्यात आले. परिसरातील मनपा शाळांची डागडुजी, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा, तसेच उद्यानांचे नूतनीकरण व सुशोभीकरण करण्याची मागणी करण्यात आली. याशिवाय युवकांसाठी क्रीडांगणे, नागरिकांसाठी वाचनालय तसेच इतर मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. मनपा आयुक्तांना निवेदन देताना प्रभाग क्रमांक २१ च्या नगरसेविका श्वेता भंडारी, निर्मल भंडारी तसेच गणेश धात्रक उपस्थित होते. यावेळी नागरिकांच्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# वाल्मिकी समाजातर्फे मंत्री आठवले यांना निवेदन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** अखिल भारतीय वाल्मिकी नवयुवक संघाने वाल्मिकी समाजाच्या मागण्यांसाठी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले व देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन दिले.

मंत्री आठवले हे देवळाली कॅम्पच्या दौऱ्यावर आले असता संघाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना निवेदन दिले. त्यात पुढील तीन प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्डामध्ये सफाई कामगारांची कायमस्वरूपी भरती करावी, या बोर्डातील सर्व रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्यात यावे, देवळाली शहरातील कोणत्याही एका प्रमुख मार्गाचे 'महर्षी वाल्मिकी मार्ग' असे नामकरण करावे. या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशी विनंती संघाने केली आहे. संघाचे मुख्यालय जयभवानी रोड येथे आहे.

निवेदनावर राष्ट्रीय अध्यक्ष महेशकुमार ढकोलिया, प्रदेश अध्यक्ष राजेंद्र बागडे, जिल्हाध्यक्ष सुरेंद्र मेहरोलिया, राष्ट्रीय सचिव लक्ष्मण ढकोलिया व महानगरप्रमुख राहुल चटोले यांच्या सह्या आहेत.

# अंबडला कचरा कुंडीत मृत नवजात अर्भक

**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** येथील एका शाळेजवळील कचरा कुंडीत मयत अर्भक आढळून आल्याची घटना काल सकाळी उघडकीस आली. अंबड एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अर्भकाचा मृतदेह ताब्यात घेतला असून प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अंबड गावातील मुख्य रस्त्यालगत असलेल्या एका शाळेच्या भिंतीजवळील कचरा कुंडीत संशयास्पद स्थितीत अर्भक पडलेले असल्याचे काही नागरिकांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ अंबड एमआयडीसी पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलिस हवालदार सोमनाथ झोले आणि इतर कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसराची पाहणी करून अर्भक ताब्यात घेतले व रुग्णवाहिकेतून शासकीय रुग्णालयात पाठविले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर अर्भक मृत असल्याचे स्पष्ट झाले.

पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू केली आहे. अर्भक येथे कोणी आणून टाकले आणि त्यामागील नेमके कारण काय, याचा शोध घेतला जात आहे. याप्रकरणी अंबड एमआयडीसी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शेवाळे करीत आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक संपादक श्री. चंदुलाल शाह यांनी चैतन्य आर्ट्स, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक-३ येथे छापून भ्रमर कार्यालय, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक -३ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी २५१४६५०, २५११७६०
E-Mail-daily_bhramar@rediffmail.com नाशिकरोड संपर्क कार्यालय, बिटको क्लासिक, मुक्तिधाम समोर, नाशिकरोड, दूरध्वनी २४५६५४९. कार्यकारी संपादक- हितेश चंदुलाल शाह ✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
Printed, Published and Owned by Shri. Chandulal Shah and printed at Chaitanya Arts, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3 and published at Daily Bhramar, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3. ✻ Editor : Chandulal Shah ✻ Executive Editor : Hitesh Chandulal Shah.